दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २०५ I शनिवार ९ मे २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## कर्जत नगराध्यक्ष अविश्वास प्रस्तावासाठी राम शिंदे व रोहित पवार एकत्र

**कर्जत :** नगरपंचायतच्या नगराध्यक्ष रोहिणी सचिन घुले यांच्या विरोधात १३ नगरसेवकांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना लेखी पत्र देऊन अविश्वास प्रस्ताव दाखल करून त्यांना पदावरून काढून टाकावे, अशी मागणी केली आहे. यामुळे कर्जतमध्ये पुन्हा एकदा राजकीय भूकंप झाला आहे.



जिल्हाधिकाऱ्यांकडे १३ नगरसेवकांनी नगराध्यक्ष रोहिणी घुले यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. या प्रस्तावावर गटनेते प्रा. सतीश पाटील, सुवर्णा रवींद्र सुपेकर, उषा अक्षय राऊत, प्रतिभा नंदकिशोर भैलुमे, लंकाबाई देविदास खरात, छाया सुनील शेलार, अश्विनी गजानन दळवी, ताराबाई सुरेश कुलथे, मोनाली ओंकार तोटे, मोहिनी दत्तात्रय पिसाळ, नामदेव चंद्रकांत राऊत, अमृत श्रीधर काळदाते, ज्योती लालासाहेब शेळके यांच्या सह्या आहेत. नगरपंचायतमध्ये एकूण १७ नगरसेवक आहेत.

# यंदा..दहावीचा टक्का घसरला..

## राज्याचा निकाल ९२.०९ टक्के : मुलींनीच मारली बाजी

■ **कोकण विभाग अव्वल, संभाजीनगरचा निकाल सर्वात कमी**
■ **१५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांपैकी १४ लाख २० हजार विद्यार्थी उत्तीर्ण**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर करण्यात आला असून यंदा राज्याचा एकूण निकाल ९२.०९ टक्के लागला आहे. बारावीप्रमाणेच दहावीच्या निकालातही यंदा सुमारे दोन टक्क्यांनी घट झाल्याचे दिसून आले. दरम्यान, यंदाही मुलींनी बाजी मारत मुलांपेक्षा अधिक टक्केवारी मिळवली आहे.

राज्य मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी पत्रकार परिषद घेऊन निकालाची घोषणा केली. यावर्षी राज्यभरातून १५ लाख ५५ हजार ०२६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी १४ लाख २० हजार ४८६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

निकालामध्ये मुलींची कामगिरी पुन्हा एकदा उजवी ठरली. मुलींचा निकाल ९४.९६ टक्के लागला असून मुलांचा निकाल ९०.५६ टक्के इतका आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात मुलींचे सातत्यपूर्ण वर्चस्व कायम असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.


विभागनिहाय निकालात कोकण विभागाने पुन्हा एकदा राज्यात अव्वल स्थान पटकावले आहे. कोकण विभागाचा निकाल तब्बल ९७.६२ टक्के लागला. त्याखालोखाल कोल्हापूरचा ९५.४७ टक्के, **(पान ४ वर)**



**विभागनिहाय निकाल**

कोकण: ९७.६२ टक्के
पुणे: ९४.२४ टक्के
नागपूर: ८९.०७ टक्के
मुंबई: ९४.९७ टक्के
कोल्हापूर: ९५.४७ टक्के
अमरावती: ९०.५० टक्के
नाशिक: ९०.५३ टक्के
लातूर: ८८.४२ टक्के
छत्रपती संभाजीनगर: ८८.४१ टक्के

### महत्त्वाचे..



**ममतांना पराभूत करणारे सुवेंदू अधिकारी आज घेणार मुख्यमंत्रीपदाची शपथ**

बंगालच्या नव्या मुख्यमंत्र्यांच्या नावाची घोषणा झाली असून भाजपाचे नेते सुवेंदू अधिकारी नवे मुख्यमंत्री होणार आहेत. आज शनिवारीते ११ वाजता शपथ घेणार आहे. विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर भाजप बंगालमध्ये आपले पहिले सरकार स्थापन करण्याच्या तयारीत आहे. सुवेंदू अधिकारी यांनी माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा पराभव केला.

पश्चिम बंगालमधील नव्या सरकारचा शपथविधी ९ मे रोजी होईल. भाजप विधिमंडळ पक्षाच्या बैठकीपूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह कोलकाता येथे दाखल झाले, जिथे सुवेंदू अधिकारी यांच्यासह भाजप नेत्यांनी त्यांचे स्वागत केले. सूत्रांनुसार, शपथविधी सोहळ्यापूर्वी विधिमंडळ पक्षनेत्याची निवड करण्यासाठी आज पक्षाच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक होणार आहे. अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीत भाजपच्या विधिमंडळ पक्षनेत्याची निवड होण्याची शक्यता आहे, जो बंगालचा पुढील मुख्यमंत्री असेल.

# किराणा पुरवठादारांकडून साई संस्थानची फसवणूक...?

## दाखवला 'अ' दर्जाचा माल; पुरवठा मात्र 'क' दर्जाचा असल्याचा आरोप

**शिर्डी प्रसादालयातील महाप्रसादाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह; उच्च न्यायालयात जाण्याचा इशारा**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव शहर :** शिर्डीतील साईबाबा संस्थान च्या प्रसादालयाबाबत धक्कादायक माहिती समोर आली असून महाप्रसादासाठी वापरला जाणारा किराणा माल निकृष्ट दर्जाचा असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते संजय काळे यांनी केला आहे. निविदा प्रक्रियेत 'अ' दर्जाचा माल दाखवून प्रत्यक्षात 'क' दर्जाचा माल पुरवला जात असल्याचा दावा करण्यात आल्याने साईभक्तांमध्ये चिंतेचे वातावरण निमाण झाले आहे.माहिती अधिकारातून मिळालेल्या माहितीनुसार संजय काळे यांनी प्रसादालय व भांडार विभागातील किराणा मालाची प्रत्यक्ष पाहणी केली. यामध्ये मूग, धने, जिरे, गहू, तांदूळ, तूरडाळ, काजू, किसमिस, साखर, हरभरा यासह १७ प्रकारच्या वस्तूंची तपासणी करण्यात आली. निविदेत दाखवलेल्या नमुन्यांपेक्षा प्रत्यक्ष वापरला जाणारा माल दर्जाहीन असल्याचा आरोप काळे यांनी केला आहे. या प्रकरणात मोठा आर्थिक भ्रष्टाचार झाल्याचा संशय व्यक्त करत काळे यांनी उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे. दोषींवर कारवाई न झाल्यास उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचा **(पान ४ वर)**



**१०० कोटींचा किराणा**

साई संस्थानच्या प्रसादालयात दररोज ५० हजारांहून अधिक भाविक मोफत महाप्रसादाचा लाभ घेतात. यासाठी दरवर्षी अंदाजे ७० ते १०० कोटी रुपयांचा किराणा माल खरेदी केला जातो. मुंबई, पुणे, नाशिक आणि जळगाव येथील २० पेक्षा अधिक पुरवठादारांकडून हा माल संस्थानला पुरवला जातो.

# मला जबरदस्तीने नऊ लग्ने करायला लावली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बीड :** गावाकडील अविवाहित तरुणांना लग्नाचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक करणाऱ्या टोळीचा अखेर पर्दाफाश झाला असून या प्रकरणातील मुख्य आरोपी तरुणीला पोलिसांनी अटक केली आहे. दरम्यान, या तरुणीचा एक धक्कादायक व्हिडीओ समोर आला असून मी स्वखुशीने नऊ लग्ने केली नाहीत, तर मला जबरदस्तीने हे सर्व करायला भाग पाडण्यात आले, असा गंभीर दावा तिने केला आहे.

**'लुटेरी दुल्हन'चा व्हिडीओ व्हायरल...**

या तरुणीचे नाव भारती गुमस्ते असे असून तिने सोशल मीडियावर जारी केलेल्या व्हिडीओत संपूर्ण प्रकार उघड केला आहे. माझे वडील नाहीत. घरी आई, पाच बहिणी आणि एक भाऊ आहे. या प्रकरणात माझ्या कुटुंबातील कुणाचाही संबंध नाही, असे भारतीने स्पष्ट केले आहे.

तिने व्हिडीओमध्ये अर्चना पाटील, तिचा मुलगा सागर, गणेश अंदुरे आणि राधा अंदुरे या चौघांची नावे घेत गंभीर आरोप केले आहेत. हे चौघे मला सतत **(पान ४ वर)**



### रशियाची मक्तेदारी संपली...

# भारताचा आर्मेनियाशी ऐतिहासिक 'डिफेन्स' करार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** जागतिक राजकारणाच्या बुद्धिबळावर सध्या अतिशय वेगाने हालचाली सुरू आहेत. एकेकाळी रशियाचा 'उपग्रह' मानला जाणारा आर्मेनिया आता रशियाच्या प्रभावातून बाहेर पडला असून त्याने भारतासोबत आपले भविष्य जोडले आहे. दक्षिण कॉकेशस प्रांतात सुरू असलेल्या या भू-राजकीय बदलाने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. आर्मेनियाने रशियाकडून होणारी ९०% शस्त्र आयात आता १० टक्क्यांहून खाली आणली असून, भारताला आपला सर्वात मोठा शस्त्र पुरवठादार देश बनवले आहे. हा बदल केवळ व्यापारापुरता मर्यादित नसून तो पुतिन प्रशासनासाठी एक मोठा राजनैतिक पराभव मानला जात आहे.

युक्रेनसोबतच्या प्रदीर्घ युद्धात रशिया अडकल्यामुळे त्याचा प्रभाव आपल्या जुन्या मित्रराष्ट्रांवरून कमी झाला आहे. आर्मेनिया आणि अझरबैजान यांच्यातील संघर्षात रशियाने अपेक्षित मदत न केल्यामुळे आर्मेनियाचा रशियन शस्त्रांवरील विश्वास उडाला आहे. गेल्या काही वर्षांत झालेल्या दोन युद्धांमध्ये आर्मेनियाने मोठी हानी सोसली. परिणामी, आर्मेनियाने पश्चिमेकडील देश आणि भारताकडे मदतीचा हात मागितला आहे. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या संधीचा फायदा घेत आर्मेनियाला लष्करी आणि राजनैतिक पाठबळ दिले आहे.

आर्मेनिया आता भारताचा सर्वात मोठा शस्त्र आयातदार देश बनला आहे. २०२२ पासून आर्मेनियाने भारताकडून सुमारे २ अब्ज डॉलर्स म्हणजेच १६,००० कोटी रुपयांहून अधिक किमतीची शस्त्रे खरेदी केली आहेत.




**भारतीय विनाशकारी शस्त्रास्त्रांचा धुमाकूळ!**

■ **पिनाका मल्टी-बॅरल रॉकेट लॉंचर:** अझरबैजानच्या ड्रोन हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी हे अत्यंत प्रभावी ठरत आहे.
■ **आकाश-१एस क्षेपणास्त्र प्रणाली:** हवाई संरक्षणासाठी भारताची ही स्वदेशी प्रणाली आता आर्मेनियाच्या सीमांचे रक्षण करत आहे.
■ **प्रलय बॅलिस्टिक क्षेपणास्त्र:** भारताने आपले घातक 'प्रलय' क्षेपणास्त्रही आर्मेनियाला दिले आहे, ज्यामुळे त्यांच्या आक्रमक क्षमतेत मोठी वाढ झाली आहे.
■ **एटीएजीएस आणि मारग तोफा:** भारतीय बनावटीच्या या तोफा आता आर्मेनियाच्या तोफखान्याचा कणा बनल्या आहेत.
■ याशिवाय, आर्मेनिया आपल्या सुखोई विमानांना भारतीय मानकांनुसार अपडेट करण्यासाठी आणि नवीन विमाने खरेदी करण्यासाठी सुमारे ३ अब्ज डॉलर्सच्या महाकरारावर चर्चा करत आहे.

# बेलापूर खुर्द येथे मुलीवर बिबट्याची झडप

## मुलगी गंभीर जखमी !



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील बेलापूर खुर्द परिसरात बिबट्याने धुमाकूळ घातला असून बनातील केशव गोविंद मदिर पूर्वेस राहत असलेल्या शेतकरी चंद्रकांत पुजारी यांची कन्या श्रद्धा आपल्या बाईकवर घरी चालली असतानाच दबा धरून बसलेल्या बिबट्याने झडप घालून जखमी केल्याची घटना शुक्रवारी साडे नऊ वाजेच्या सुमारास घडली.

तिला प्रथम श्रीरामपूर दवाखान्यात नेण्यात आले. त्यांनतर अहिल्यानगर येथे सरकारी दवाखान्यात पाठविण्यात आल्याची माहिती समजते. त्यामुळं बिबट्याच्या हल्ल्यामुळे परिसरातील नागरिकामध्ये भितीचे वातावरण पसरले असून तेथे लग्न समारंभ कार्यक्रम सुरू असल्याने नागरिकांनी मोठी गर्दी जमली होती.त्या मुलीची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळत आहेत.

मुलीचा आरडाओरडा ऐकून तिला वाचवण्यासाठी नागरिकांनी धाव घेतली,या परिसरात अनेकवेळा बिबट्यांचा मुक्तसंचार दिसून आला आहे.बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी स्थानिकांनी सातत्याने वनविभागाकडे केली.पण, त्याकडे वनविभागाकडून पिजरा लावावा अशी मागणी केली असताना या मागणीकडे साफ दुर्लक्ष केल्याने ही घटना घडल्याचे गावकऱ्यांनी सागितले.

# शिर्डीतील पंटरने कॅप्टन खरातला फसवले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** मी शिर्डीलतील गोंदकर यांच्या चार एकर जमीनी चा कायदेशीर व्यवहार केल्याची कबूली कॅप्टन खरात याने शिर्डी पोलिसांच्या कस्टडीत दिली असून मला माझ्या साक्षीदारानेच फसवल्याचा गंभीर आरोप केला आहे. त्यामुळे या व्यवहाराशी संलग्न असलेले प्रभाकर गुंजाळ व सचिन वाणी या साक्षीदारांना शिर्डी पोलीसांनी ताब्यात घेतले असून त्यांचे जबाब नोंदवून घेतले आहेत.

शिर्डी येथील निघोज शिवारातील रावसाहेब गोंदकर यांची ४ एकर जमीन व्याजाच्या पैशात खरेदी करून घेतल्या प्रकरणी गोंदकर यांनी मागील महिन्यात कॅप्टन अशोककुमार खरात, त्याची पत्नी कल्पना खरात, अरविंद बावके, किरण सोनवणे यांचे विरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्या गुन्हयात शिर्डी पोलीसांनी कॅप्टन खरात यास दि ४ मे रोजी ताब्यात घेत ५ मेला कोर्टात उभे केले असता न्यायालयाने ९ तारखे पर्यंत पोलीस कोठडी सुनावली होती. या कोठडीत शिर्डी पोलीसांनी खरात ला बोलते केले असता तो म्हणाला की, गोंदकर जमीन खरेदी व्यवहारात ती जमीन अरविंद बावके व किरण सोनवणे यांनी दाखवली होती. शिर्डी पोलिसांकडून या गुन्ह्यात सर्व साक्षीदार तपासण्यात आले. त्यानुसार शिर्डी पोलिसांचा तपास पूर्ण झाल्याचे समजते त्यामुळे शिर्डी पोलीस पुढली कस्टडी मागण्याच्या फंदात पडणार नसल्याचे चित्र आहे.

**वाणी व गुंजाळ यांचे जबाब नोंदवले**

■ **जमीन खरेदी चे ५ कोटी ५२ लाख रुपये पैसे गोंदकर यांस आधिच दिले होते. ते पैसे त्याने परत दिले असते तर खरेदी उलटवणार होतो यात व्याजाचा विषय नव्हता. त्यामुळे हा व्यवहार पुर्ण पणे कायदेशीर असून यात मला साक्षीदारांनी फसवले असे त्याने पोलिसांना सांगितले आहे.जमीन खरेदीसाठीच्या रकमा कोठून आल्या याचा तपास सुरु आहे. दरम्यान त्याने कस्टडीत अनेक साक्षीदारांची नावे घेतली असून त्यापैकी काल शिर्डी पोलीसांनी प्रभाकर गुंजाळ व सचिन वाणी यांना ताब्यात घेतले असून त्यांनी नोंदवलेले जबाब कोर्टाचे सुनावणी वेळी समोर ठेवले जाणार आहे.**



## संपादकीय

# लैंगिक विकृतीचे साम्राज्य

चार-पाच वर्षांच्या चिमुकल्या मुलींवर लैंगिक अत्याचार होत असल्याच्या घटना आज महाराष्ट्रासह संपूर्ण देशाला हादरवत आहेत. या घटना केवळ गुन्हेगारीच्या चौकटीत मोजून चालणार नाहीत; त्या समाजाच्या नैतिक दिवाळखोरीची, प्रशासनाच्या अपयशाची आणि राजकीय संवेदनशून्यतेची रक्तरंजित नोंद आहेत. एका निरागस बालिकेवर अत्याचार करून तिचा खून करणारा नराधम हा फक्त विकृत व्यक्ती नसतो, तर तो त्या व्यवस्थेचा उत्पादन असतो जिथे कायद्याची भीती संपते, स्त्रीला वस्तू मानले जाते आणि सत्ताधारी समाजाच्या मूलभूत प्रश्नांपासून दूर जातात.

आज परिस्थिती इतकी भयावह झाली आहे की, एखादा सत्तर वर्षांचा वृद्धही बलात्कारासारखे अमानुष कृत्य करायला मागेपुढे पाहत नाही. याचा अर्थ फक्त त्याची मानसिक विकृती नाही; तर समाजातील नैतिक नियंत्रण संपत चालले आहे. कायद्याचा धाक उरलेला नाही. आपले काहीही बिघडणार नाही, ही भावना गुन्हेगारांच्या मनात बळावत चालली आहे. कारण अनेकदा आरोपींना राजकीय संरक्षण मिळते, तपासावर दबाव येतो, आणि न्यायालयीन प्रक्रिया वर्षानुवर्षे लांबतात. परिणामी कायदा सामान्यांसाठी आणि प्रभावशालींसाठी वेगळा असल्याची भावना समाजात निर्माण होते.

लहान मुलींवरील अत्याचार हा केवळ लैंगिक प्रश्न नाही. तो सत्ता, हिंसा, दडपशाही आणि पुरुषप्रधान मानसिकतेचा प्रश्न आहे. स्त्री म्हणजे उपभोगाची वस्तू, तिच्या इच्छेला किंमत नाही, तिचे स्वातंत्र्य दुय्यम आहे, हे संस्कार समाजात अजूनही खोलवर रुजलेले आहेत. मुलींना लहानपणापासून सांभाळून राहा शिकवले जाते; पण मुलांना स्त्रीचा आदर करा हे शिकवण्याची सामाजिक तयारी अजूनही अपुरी आहे.

आज डिजिटल माध्यमांनी परिस्थिती अधिक गुंतागुंतीची केली आहे. मोबाईलच्या एका क्लिकवर हिंसक आणि विकृत अश्लील सामग्री उपलब्ध होते. सोशल मीडियावर कोणतेही नियंत्रण नाही. अशा सामग्रीचा सतत संपर्क काही व्यक्तींमध्ये लैंगिकतेविषयी विकृत समज निर्माण करतो. विशेषतः मानसिकदृष्ट्या अस्थिर किंवा भावनिकदृष्ट्या कमकुवत व्यक्तींमध्ये हे अधिक धोकादायक ठरते. परंतु या सर्वांपेक्षा गंभीर बाब म्हणजे समाजातील वाढती असंवेदनशीलता. बलात्काराच्या घटना आता लोकांना काही दिवस हादरवतात; मग समाज पुन्हा पुढच्या बातमीकडे वळतो. ही विस्मृतीच व्यवस्थेला सोयीची ठरते.

राजकीय व्यवस्थेची भूमिकाही चिंताजनक आहे. एखादी घटना घडली की निषेध, मोर्चे, भाषणे आणि मोठमोठ्या घोषणा होतात. पण दीर्घकालीन उपाययोजना करण्याची इच्छाशक्ती फारशी दिसत नाही. काही वेळा आरोपींचे राजकीय संबंध असल्यामुळे तपासावर परिणाम झाल्याचेही दिसून येते. मग सामान्य माणसाच्या मनात प्रश्न निर्माण होतो की, राज्य खरोखर कायद्याने चालते की राजकीय प्रभावाने?

आज मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न हा केवळ पोलिसांचा विषय राहिलेला नाही; तो समाजाच्या आरोग्याशी जोडलेला प्रश्न आहे. शिक्षणव्यवस्था, कुटुंब, संस्कार, माध्यमे आणि राजकीय नेतृत्व या सर्वांनी आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. कारण केवळ कठोर शिक्षा करून हा प्रश्न सुटणार नाही. शिक्षा निश्चित आणि जलद असली पाहिजेच; पण त्याचबरोबर मानसिक आरोग्य, लैंगिक शिक्षण आणि स्त्री-पुरुष समानतेचे संस्कार यांची जोड आवश्यक आहे. लैंगिक विकृतीच्या मुळाशी मानसशास्त्रीय आणि सामाजिक घटकांचा गुंतागुंतीचा संबंध असतो. काही व्यक्तींमध्ये आवेगांवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता कमी असते. काहींना हिंसक किंवा विकृत अनुभवांमध्ये आनंद वाटू लागतो. बालपणीचे अत्याचार, कौटुंबिक हिंसा, व्यसनाधीनता, भावनिक रिकामेपणा आणि स्त्रीविषयीचे चुकीचे संस्कार हे घटकही अशा गुन्ह्यांना खतपाणी घालतात. मात्र हे समजून घेणे म्हणजे गुन्हेगाराचे समर्थन करणे नव्हे. उलट अशा विकृती निर्माण होऊ नयेत यासाठी समाजाने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

गुगल आणि व्हॉट्सअॅप युनिव्हर्सिटीच्या आधारे समाजशास्त्र किंवा मानसशास्त्र समजत नाही. वैज्ञानिक, विवेकनिष्ठ आणि मानवी दृष्टीकोन आवश्यक आहे. मुलांना योग्य वयात लैंगिक शिक्षण देणे, संमतीची संकल्पना समजावणे, दुसऱ्याच्या शरीराचा आणि स्वातंत्र्याचा आदर शिकवणे, हे आज अत्यंत गरजेचे झाले आहे. दुर्दैवाने, आपल्या समाजात लैंगिक शिक्षणाला अजूनही संशयाने पाहिले जाते. परिणामी मुलांची माहिती इंटरनेटवरून होते आणि त्यातून विकृत समज वाढतात. महाराष्ट्राने महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा स्त्रीशिक्षण आणि समानतेचा वारसा जगाला दिला. पण त्याच महाराष्ट्रात मुलींना घराबाहेर पडताना भीती वाटत असेल, तर हा केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नाही; तर सामाजिक अध:पतनाचा इशारा आहे. आज गरज आहे ती फक्त संताप व्यक्त करण्याची नाही, तर संघटित सामाजिक दबाव निर्माण करण्याची. समाजाने प्रश्न विचारले पाहिजेत. सरकारला जबाबदार धरले पाहिजे. न्यायव्यवस्थेला वेग मागितला पाहिजे. पोलिसांना संवेदनशील प्रशिक्षण दिले पाहिजे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मुलगा आणि मुलगी यांच्यात समानतेचे संस्कार रुजवले पाहिजेत.

कारण शेवटी प्रश्न फक्त गुन्हेगारांचा नाही. प्रश्न आहे की, आपण कोणता समाज निर्माण करतो आहोत? जर चार वर्षांची मुलगीही सुरक्षित नसेल, तर विकासाच्या घोषणा, स्मार्ट सिटी, डिजिटल इंडिया आणि प्रगतीचे दावे हे सर्व केवळ पोकळ शब्द ठरतात. लोकशाही फक्त निवडणुकांनी जिवंत राहत नाही; ती सामान्य माणसाच्या सुरक्षिततेने जिवंत राहते. आणि आज त्या सुरक्षिततेवरच सर्वात मोठा प्रश्नचिन्ह उभा राहिला आहे.

# 'राम कृष्ण हरी' फेम रीलस्टार शुभम पवार जनगणनेचे 'ब्रँड अॅम्बेसेडर'

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** सोशल मीडियावर 'राम कृष्ण हरी' या खास टॅगलाईनमुळे घराघरात पोहोचलेले रीलस्टार शुभम पवार आता जनगणना २०२६ आणि शासकीय योजनांच्या जनजागृतीचे 'ब्रँड अॅम्बेसेडर' बनले आहेत. टाकळीभान येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक असलेल्या शुभम पवार यांनी ग्रामीण भाषेतील सहज, उपदेशात्मक आणि मनोरंजक रील्समधून तीन लाखांहून अधिक फॉलोअर्सची मने जिंकली आहेत. त्यांच्या लोकप्रियतेचा प्रभावी वापर करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. श्रीरामपूरचे प्रांताधिकारी किरण सावंत पाटील यांच्या संकल्पनेतून आणि तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली शुभम पवार यांना अधिकृत नियुक्तीपत्र देत मोहिमेचे 'सारथी' म्हणून जबाबदारी दिली. जनगणना, निवडणूक प्रक्रिया, मतदार नोंदणी तसेच विविध कल्याणकारी योजनांची माहिती आता शुभम पवार यांच्या डिजिटल शैलीतील रील्सद्वारे नागरिकांपर्यंत पोहोचवली जाणार आहे. यावेळी नायब तहसीलदार दत्तात्रय शेकटकर, सहाय्यक महसूल अधिकारी निलेश इंगळे, तलाठी राजेश घोरपडे, संदीप पाळंदे, राजेश कवाने आणि महसूल विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

> शुभम पवार यांनी आपल्या कौशल्याने तरुणाईमध्ये मोठी ओळख निर्माण केली आहे. शासकीय योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी डिजिटल माध्यमाचा वापर प्रभावी ठरेल, याच उद्देशाने ही जबाबदारी त्यांना देण्यात आली आहे.
>
> **– मिलिंदकुमार वाघ, तहसीलदार, श्रीरामपूर**

> प्रशासनाने माझ्यावर जो विश्वास दाखवून जनगणना आणि शासकीय योजनांच्या जनजागृतीची जबाबदारी दिली आहे, तो माझ्यासाठी मोठा बहुमान आहे. सोशल मीडियाचा वापर केवळ मनोरंजनासाठी न राहता, तो देशकार्यासाठी आणि सामान्यांच्या हितासाठी व्हावा, असा माझा प्रयत्न राहील.
>
> **– शुभम पवार, रीलस्टार**




श्रीरामपूर : तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांच्या हस्ते जनगणना प्रसिद्धी प्रमुखचे नियुक्ती पत्र स्वीकारताना प्रसिद्ध रीलस्टार शुभम पवार. (छाया : संदिप पाळंदे)

# अहिल्याबाई होळकर शाळेचा बारावीचा निकाल ८१.६३ टक्के; मुलींचीच 'बाजी'



कोकरे विजया



पुंड ऋतूजा



रेश्मा पठाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बालाजी देडगाव :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या बारावीच्या निकालात नेवासा तालुक्यातील देडगाव येथील अहिल्याबाई होळकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने आपले यशाचे सातत्य टिकवून ठेवले आहे. शाळेचा एकूण निकाल ८१.६३ टक्के लागला असून, यंदाही मुलींनीच निकालात बाजी मारल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये प्रथम कोकरे विजया पोपट ( ७४.३३ % ), द्वितीय पुंड ऋतुजा किशोर (७२.६७ % ), तृतीय पठाण रेश्मा इन्नुस ७१.५० % मुलींचे प्रमाण मुलांच्या तुलनेत अधिक आहे. तर मागासवर्गीय मध्ये कोकरे विजया पोपट ७४. ३३ %, पुंड ऋतुजा किशोर ७२.६० %, वाल्हेकर सुप्रिया विक्रम ६६ . ५०% यां मुलींनी बाजी मारली तर अनेक गुणवंत विद्यार्थी प्रथम श्रेणीत आले आहेत. निकाल जाहीर होताच शाळेच्या परिसरात एकच जल्लोष करण्यात आला. यंदाचा निकाल हा शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांच्या एकत्रित प्रयत्नांचे फळ असल्याचे शाळेचे मुख्याध्यापक रूपचंद गायकवाड यांनी सांगितले. ग्रामीण भागातील मुलींनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवलेले हे यश कौतुकास्पद आहे.

**यशस्वी विद्यार्थ्यांचे मुळा एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष उदयन दादा गडाख यांनी अभिनंदन केले आहे. तर सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. निकालात मुलींनी मारलेली बाजी ही महिला सक्षमीकरणाच्या दिशेने टाकलेले एक आश्वासक पाऊल मानले जात आहे. शाळेच्या व्यवस्थापन समितीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे विशेष कौतुक केले आहे.**

**विद्यार्थ्यांच्या यशस्वीरितेसाठी प्रा. एल.ए. निमसे, प्रा.जी मुंगसे, प्रा . पी.एस दरंदले, प्रा. ए.डी.गायकवाड, प्रा.बी. आर. चौधरी, प्रा.एम. व्ही. ताके आदी शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.**

> **आमच्या शाळेतील मुलींनी अभ्यासात दाखवलेली चिकाटी आणि शिक्षकांनी दिलेले मार्गदर्शन यामुळेच आम्ही ८१ टक्क्यांचा टप्पा ओलांडू शकलो. मुलींच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.''**
>
> **– मुख्याध्यापक स्वरूपचंद गायकवाड , अहिल्याबाई होळकर शाळा.**

# अनोळखी मृतदेहाचा शिवमुद्रा निपुंगे यांच्या पुढाकाराने सन्मानाने अंत्यविधी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** एका अनोळखी मृतदेहाचा अंत्यविधी... नाव नाही, गाव नाही, वारस नाही. पोलीस स्टेशनच्या दप्तरी फक्त एक 'अज्ञात' नोंद. पण नेवासा फाट्यावर माणुसकीने नवी नोंद केली. ''आम्ही आहोत... आम्ही त्यांचे कोणीतरी आहोत ही भूमिका घेत शिवमुद्रा अँम्ब्युलन्सचे संस्थापक विकासभाऊ निपुंगे यांनी पोलिसांच्या उपस्थितीत अनोळखी मृतदेहाचा मोफत सेवा देत सन्मानाने अंत्यविधी करण्यासाठी पुढाकार घेतला नेवासा फाटा परिसरात एका अनोळखी व्यक्तीचा अपघाती मृत्यू झाला होता,अपघातातील इसमाची ओळख पटली नाही. नातेवाईकांचा शोध लागला नाही. अशा वेळी मृतदेहाचे काय? हा प्रश्न प्रशासनासमोर होता. नेवासा फाटा येथील शिवमुद्रा रुग्णवाहिकाचे संस्थापक व चालक म्हणून काम पहाणारे विकास निपुंगे यांना अपघाताची माहिती मिळताच कोणतीही फि न आकारता संपूर्ण जबाबदारी घेतली.

मृतदेह ताब्यात घेण्यापासून,शवविच्छेदन, कागदपत्रांची पूर्तता आणि थेट अंत्यविधी -संपूर्ण प्रक्रिया मोफत पार पाडली. अंत्यविधीला कोण होते? या अनोळखी जिवाच्या अंतिम यात्रेत नगरपंचायतचे कर्मचारी, पोलीस बांधव आणि शिवमुद्राची टीम सहभागी झाली.

जाती-धर्म-नात्यापलीकडे जाऊन एका माणसाला 'माणूस' म्हणून सन्मानाने निरोप देण्यात आला. शिवमुद्राचे कार्य:गेल्या अनेक वर्षांपासून शिवमुद्रा अँम्ब्युलन्स नेवासा फाटा येथे २४ तास मोफत सेवा देत आहे. अपघात, आजारपण, अंत्यविधी कोणत्याही परिस्थितीत गरजूंच्या मदतीला धावून जाणे, हे या संस्थेचे ब्रीदवाक्य आहे. या मानवतावादी कार्याबद्दल परिसरातून शिवमुद्राचे संस्थापक विकास निपुंगे व त्यांच्या टीमचे कौतुक करण्यात येत आहे.



# श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयात जनगणना प्रगणक व पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण उत्साहात



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा नगरपंचायत क्षेत्रासाठी जनगणना २०२७ अंतर्गत नियुक्त प्रगणक व पर्यवेक्षक यांचे तीन दिवसीय प्रशिक्षण श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय, येथे दि. ५ ते ७ या कालावधीत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या प्रशिक्षणामध्ये ४० प्रगणक व १० पर्यवेक्षकांनी सक्रिय सहभाग नोंदविला. प्रशिक्षणासाठी प्रा.संदीप शिरसाठ व प्रा.डॉ. भागवत बडे यांनी फिल्ड ट्रेनर म्हणून उपस्थित राहून जनगणना प्रक्रियेबाबत सखोल मार्गदर्शन केले. प्रशिक्षणार्थींना जनगणनेतील विविध बाबी, कार्यपद्धती तसेच प्रत्यक्ष क्षेत्रीय कामकाजाविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर केंद्र शासनाच्या मार्फत उपलब्ध करून देण्यात आलेली माहिती पुस्तिका वितरित करण्यात आली. यावेळी प्रशिक्षणार्थी शिक्षक नितीन खरात,श्रीमती कोल्हे व म्हस्के यांनी मनोगत व्यक्त करत प्रशिक्षण उपयुक्त व मार्गदर्शक ठरल्याची भावना व्यक्त केली. प्रा. रामराव काळे यांनी जनगणना कर्मचाऱ्यांसाठी विमा कवच उपलब्ध करून देण्याची मागणी मांडली. सूत्रसंचालन राजू आडे यांनी केले.यावेळी जनगणनेची शपथ उपस्थितांना देण्यात आली.

# श्री कालभैरवनाथ देवस्थानचे अध्यक्ष अशोकराव कोलते पाटील यांचे निधन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील बहिरवाडी येथील श्री कालभैरवनाथ देवस्थानचे अध्यक्ष अशोक कोलते यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी गुरुवारी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. अशोक कोलते यांच्या पश्चात पत्नी,तीन भाऊ,दोन बहिणी,तीन मुली,एक मुलगा, सून,नातवंडे जावई असा परिवार आहे. देवगड संस्थानचे महंत राष्ट्रसंत भास्करगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली श्री कालभैरवनाथ देवस्थान पब्लिक स्ट्रस्टची ७ जुलै १९९४ ला स्थापना झाल्यापासून ते आजपर्यंत एकूण ३२ वर्षांपासून देवस्थानचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले होते. त्यांच्या कारकिर्दीत श्री कालभैरवनाथ देवस्थान सर्व विश्वस्त व ग्रामस्थांसह भक्त परिवाराच्या योगदानातून व गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात येऊन प्रवरा नदीच्या मध्यधारेवर सुंदर आकर्षक मंदिर निर्माण कार्यासाठी ते योगदान मोलाचे ठरले होते.



बहिरवाडी येथील अमरधाममध्ये शुक्रवारी शोकाकुल वातावरणात नाथभक्त अशोक कोलते यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी देवगड संस्थानच्या वतीने हभप रामनाथ महाराज पवार,नेवासा प्रेस क्लबच्या वतीने सुधीर चव्हाण, ग्रामस्थ व भक्त परिवाराच्या वतीने आसाराम नळघे सर,श्री कालभैरवनाथ देवस्थानच्या वतीने सीताराम घोरपडे, धामोरी ग्रामस्थांच्या वतीने दत्तात्रय पटारे यांनी श्रद्धांजली अर्पण केली. अंत्यसंस्कार प्रसंगी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.त्यांच्या निधनाने पंचक्रोशीतील भक्त परिवारात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# दहावीच्या निकालात प्रवरा अव्वल ;

## इंग्रजी माध्यमासह १६ शाळांचा शंभर टक्के निकाल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर, :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेने दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा कायम राखली आहे. स्टेट बोर्डाच्या १४ शाळांनी शंभर टक्के निकालाची नोंद केली असून संस्थेचा एकूण निकाल ९५.४२ टक्के लागला आहे. तर सेंट्रल बोर्डाच्या दोन शाळांचा निकाल शंभर टक्के लागला आहे.

संस्था पातळीवर स्टेट बोर्डामध्ये प्रवरा पब्लिक स्कूल, प्रवरानगरचा स्नेहांकित सोपान गागरे याने ९८ टक्के गुण मिळवत




प्रथम क्रमांक पटकावला, तर सुजय अतुल आसावा याने ९६.६० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. प्रवरा विद्यामंदिर, लोणी येथील विद्या आदिनाथ खाटीक हिने ९६.२० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. सेंट्रल बोर्डामध्ये प्रवरा सेंट्रल स्कूल, प्रवरानगर आणि प्रवरा हायस्कूल, कोल्हार या शाळांचा निकाल शंभर टक्के लागला असून, प्रवरा सेंट्रल स्कूलचा पृथ्वीराज संभाजी भोसले याने ९७ टक्के आणि सुदी दीपक धामणे हिने ९६.८० टक्के गुण मिळवत अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविला. तर प्रवरा हायस्कूल, कोल्हार येथील मिताली सुग्रीव अंबूलगेकर हिने ९५.४० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला, अशी माहिती संस्थेच्या शिक्षण संचालिका लीलावती सरोदे यांनी दिली. स्टेट बोर्डामध्ये १ हजार ९४४ विद्यार्थ्यांपैकी १ हजार ८५५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

# प्राईड अकॅडेमी स्कूलचा निकाल १०० टक्के







**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** माऊली प्रतिष्ठान चॅरिटेबल ट्रस्ट संचलित प्राईड अकॅडेमी इंग्लिश मेडीअम स्कूल शाळेचा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा इयत्ता १० वी चा निकाल १०० टक्के लागला आहे. शाळेतून १० वी सुटणाऱ्या विद्यार्थ्यांची ही दुसरी बॅच होती. शाळेमध्ये तनिष्का सर्जेराव पटारे ८८.४० टक्के, ज्ञानेश्वरी नवनाथ राऊत ८८.२० टक्के व सिद्धी सुभाष टेकाळे ८७.६० टक्के गुण मिळवत अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविले. माऊली प्रतिष्ठानचे संस्थापक माऊली मुरकुटे व प्राईड अकॅडेमीच्या संस्थापिका वंदनाताई मुरकुटे यांनी यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. प्राचार्या प्रीती गोटे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# गौतम पब्लिक स्कूलची शंभर टक्के निकालाची २० वर्षांची परंपरा कायम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचलित गौतम पब्लिक स्कूलने यंदाच्या एसएससी बोर्ड परीक्षेत पुन्हा एकदा शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाने सलग २० व्या वर्षी १०० % निकालाची दैदिप्यमान परंपरा कायम राखली असल्याची माहिती प्राचार्य नूर शेख यांनी दिली.

विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये अक्षय प्रकाश आवारे याने ९३.४० % गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. साहिल रतन जाधव याने ९०.६० % गुणांसह द्वितीय, तर वेदांत महेंद्र जाधव याने ९० % गुण मिळवून तृतीय क्रमांक संपादन केला. तसेच मानस गोरख पाटील ८८.४० % आणि कार्तिक साहेबराव दाते ८७.६० % यांनी देखील विशेष प्राविण्य मिळवत शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे.

गेल्या दोन दशकांपासून गौतम पब्लिक स्कूलने सातत्याने शैक्षणिक दर्जा राखला आहे. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक शिक्षण, नैतिक मूल्ये, स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन, तसेच सांस्कृतिक व क्रीडा उपक्रमांवर विशेष भर दिला जात आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे शिक्षकांचे अथक परिश्रम, पालकांचे खंबीर सहकार्य आणि विद्यार्थ्यांची जिद्द हेच खरे यशाचे सूत्र आहे. शिक्षकांनी घेतलेल्या नियमित सराव परीक्षा, विशेष मार्गदर्शन वर्ग आणि प्रत्येक विद्यार्थ्यावर दिलेले वैयक्तिक लक्ष यामुळेच विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढत असल्याने विद्यार्थ्यांनी ही यशाची परंपरा अखंड राखली असल्याचे प्राचार्य नूर शेख यांनी नमूद केले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे सर्व शिक्षकांचे संस्थेचे चेअरमन माजी आ. अशोकराव काळे, विश्वस्त, आमदार आशुतोष काळे, संस्थेच्या सचिव सौ. चैतालीताई काळे, सोसायटीचे सर्व गव्हर्निंग कौन्सिल सदस्य व इन्स्पेक्टर प्रा. नारायण बारे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. याच बरोबर संस्था सदस्यांनी प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन केले आहे.

# न्यू इंग्लिश स्कूल काकडी विद्यालयाचा एसएससीचा ९६.१५ टक्के निकाल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचलित न्यू इंग्लिश स्कूल काकडी विद्यालयाने आपल्या यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ९६.१५ टक्के लागला असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्तेचा झेंडा रोवला आहे.विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये साई गणपत गुंजाळ याने ८४.०० % गुण प्राप्त करून विद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला. कु. सायली अशोक विघ्ने हिने ७९.६० % गुणांसह द्वितीय क्रमांक पटकावला, तर कार्तिक संदीप गुंजाळ याने ७९.२० % गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन व माजी आ. अशोक काळे, आ. आशुतोष काळे, व्हाईस चेअरमन छबुराव आव्हाड आणि चैतालीताई काळे, सोसायटीचे सर्व गव्हर्निंग कौन्सिल सदस्य व इन्स्पेक्टर प्रा. नारायण बारे यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## न्यू इंग्लिश स्कूल माळवाडगांव ९६.२२ टक्के निकाल

**माळवाडगांव** : श्रीरामपूर तालुक्यातील माळवाडगांव येथील खा.गोविंदरांव आदिक ग्रामीण शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयाचा निकाल ९६.२२ टक्के लागला असून कु. अनुष्का संदीप आसने हि विद्यार्थिनी ९८.२० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम तर आदित्य प्रदीप आसने ९५.८० व्दितीय तर कु.पायल अशोक दळे ९५.४० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे.

गुणवंत विद्यार्थ्यांचे व न्यु इंग्लिश मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद यांचे खा.गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्थेच्या अनुराधाताई आदिक ,शालेय समिती अध्यक्ष उपाध्यक्ष व पालक ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

## शनिशिंगणापूर विद्यालयाची १००% निकालाची परंपरा कायम

**सोनई** : श्री क्षेत्र शनिशिगंनापूर येथील शनेश्वर देवस्थान विश्वस्त समिती संचलित श्री शनेश्वर विद्यालयाने इयत्ता दहावीच्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली. या शैक्षणिक वर्षात विद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला असून विद्यालयातील एकूण २५ विद्यार्थी एसएससी बोर्ड परीक्षेत बसले होते. ते सर्व उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातीचे डिस्टिंक्शन मध्ये तीन विद्यार्थी फर्स्ट क्लास मध्ये सोळा विद्यार्थी, आणि सेकंड क्लास मध्ये पाच विद्यार्थी आले आहे.यामध्ये प्रथम क्रमांक कु बुचडे संध्या बाळासाहेब(८६%) द्वितीय क्रमांक कु देठे सिद्धी(८२%) तृतीय क्रमांक कुमारी सोनवणे वैष्णवी बाळासाहेब ७६ % या तीनही मुलींनी बाजी मारली . तसेच उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे सर्वांनी अभिनंदन केले.

## आदर्श विद्या मंदिर शाळेचा एस एस सी परिक्षेचा निकाल ८६.५३%

**सोनई** : येथील आदर्श विद्या मंदिर विद्यालयाचा एस एस सी परिक्षेचा निकाल ८६.५३ लागला असून प्रथम क्रमांक भक्ती प्रदिप राशिनकर हिने ९०.२० टक्के, द्वितीय क्रमांक श्रेया अनिल शिंदे हिने ८८.२० टक्के, तृतीय क्रमांक भक्ती आदिनाथ बडधे हिने ८७.०० टक्के, चतुर्थ क्रमांक जान्हवी शिवाजी तागड हिने ८६.४० टक्के तर पाचवा क्रमांक रुचिता गणेश राऊत हिने ८५.८० टक्के गुण मिळवून गुणवत्ता सिद्ध केली आहे. विद्यालयातील एकूण १०४ विद्यार्थी परिक्षेला बसले होते त्यापैकी ९० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही उत्तुंग निकालाची परंपरा शाळेने टिकून ठेवलेली आहे. इयत्ता १० वी परिक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे संस्थेच्या अध्यक्षा जयश्रीताई रविराज पाटील गडाख, सचिव रविराज तुकाराम गडाख, स्कूल कमेटीचे अध्यक्ष अरुण चांदघोडे, विद्यालयाचे मुख्याध्यापक ज्ञानदेव फोपसे, पालक वर्ग आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## प्रवरा माध्यमिक विद्यालय झरेकाठी दहावीचा निकाल ९३.५४ टक्के

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील झरेकाठी येथील प्रवरा माध्यमिक विद्यालयाने मार्च २०२६ च्या दहावी बोर्ड परीक्षेत ९३.५४ टक्के निकालाची उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये वाणी अमर अंकुश याने ८४ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. वाणी गौरव कानिफनाथ याने ८३.४० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर हारदे सोनम दादासाहेब हिने ८१ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला.

यंदाच्या परीक्षेसाठी विद्यालयातून एकूण ३१ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी २९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून दोन विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले. यामध्ये ४ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य, १३ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, ९ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी, तर ३ विद्यार्थ्यांनी पास क्लासमध्ये यश मिळविले. या यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक प्रभाकर सांगळे, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## टाकळीभान न्यू इंग्लिश स्कूलचा इयत्ता दहावीचा ८७.२६% निकाल

**टाकळीभान** - येथील न्यू इंग्लिश स्कूल व अण्णासाहेब पटारे पाटील कनिष्ठ महाविद्यालय.एस.एस.सी. परीक्षा २०२६ मध्ये विद्यालयाचा ८७.२६% निकाल लागला आहे.विद्यालयातील एकूण १५७ विद्यार्थ्यांनी एस.एस.सी. परीक्षा दिली होती त्यामध्ये १३७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयाने ८७.२६% टक्के निकालाची परंपरा कायम राखली असून त्यामध्ये कार्तिकी पाराजी पटारे हिस ९४.८ मिळवून प्रथम क्रमांक , सपकाळ कृष्णा पोपट यास ९३ द्वितीय क्रमांक तर जाधव वैभव दादासाहेब यास ९१.८ मिळवून तिसऱ्या क्रमांक मिळवला आहे. या दैदिप्यमान यशाबद्दल इयत्ता दहावीमध्ये अध्यापन करणाऱ्या सर्व विषय शिक्षकांचे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सेवक या सर्वांचे तसेच या यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य शिंदे आर.एम प्र. पर्यवेक्षक . जरे एस. एस. वर्गशिक्षक पाचपिंड ए.ए., पांढरे डी.ए. तसेच सर्व शिक्षकवृंद यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने, विद्यालयाचे स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य तथा जनरल बॉडी सदस्य बापूसाहेब पटारे, स्कूल कमिटीचे ज्येष्ठ सदस्य मंजाबापू थोरात व राहुल पटारे, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, टाकळीभान पंचक्रोशीतील शिक्षणप्रेमी, ग्रामस्थ, सर्व सेवक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# प्रवरा अभिमत विद्यापीठाचा २० वा पदवीप्रदान सोहळा

### ३२२ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर - ग्रामीण भारतात दर्जेदार शिक्षण आणि आरोग्यसेवा पोहोचवून असंख्य कुटुंबांचे जीवन बदलणारे पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांची दूरदृष्टी आजही प्रेरणादायी आहे. लोणी व किर्लोस्करवाडी हे महाराष्ट्राच्या विकासाच्या नकाशावर दिसणारे छोटे पण लक्षणीय व लक्षवेधी अशी आहेत, ही बाब कौतुकास्पद आहे. मजबूत व निरोगी आरोग्य सेवा ही राष्ट्र उभारणीच्या कार्यातील सर्वात मजबूत स्तंभापैकी एक आहे.**

रुग्णालये ही केवळ इमारती नसून आशेची किरणे जागवणारी केंद्रे आहेत. आरोग्यसेवेची खरी मोजदाद शहरांमध्ये कशा व किती प्रमाणात सुविधा उपलब्ध आहेत यावर ठरत नसून ती सेवा समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत किती प्रभावीपणे पोहोचते यावर ठरते, असे प्रतिपादन किर्लोस्कर ब्रदर्स लि.चे अध्यक्ष संजय किर्लोस्कर यांनी केले. प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस या अभिमत विद्यापीठाच्या २० व्या पदवीप्रदान समारंभात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे होते. यावेळी विशेष अतिथी म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. डॉ. सुरेश गोसावी उपस्थित होते. समारंभाला कुलगुरू डॉ. विष्णू मगरे, विश्वस्त सुवर्णाताई विखे पाटील, विश्वस्त मोनिका सावंत, विश्वस्त ध्रुव विखे, विश्वास आहेर, एम.एम.पुलाटे, स्वप्नील सावंत, पंजाबराव आहेर, कुलसचिव डॉ. रवींद्र लावरे तसेच विद्यापीठाच्या विविध महाविद्यालयांचे प्राचार्य उपस्थित होते.

संजय किर्लोस्कर पुढे म्हणाले, भारताला खऱ्या अर्थाने प्रगती करायची असेल तर गावं, निरोगी, सक्षम आणि सुरक्षित असणे आवश्यक आहे. वैद्यकीय सेवा देणे हे केवळ करिअर नसून ते मानवसेवेचे ईश्वरीय कार्य आहे. पदवी तुम्हाला व्यवसाय देईल; मात्र करुणा तुम्हाला जीवनाचा उद्देश देईल. तरुण डॉक्टरांना उद्देशून त्यांनी सांगितले, तुम्ही दिलेली औषधे लोक विसरतील; पण तुम्ही त्यांच्याशी कसे वागलात हे ते कधीच विसरणार नाहीत. आपल्या कारकिर्दीतील काही काळ डॉक्टरांनी ग्रामीण भागातील वैद्यकीय सेवेसाठी द्यावा. कारण तेथे तुमचे योगदान मोठा बदल घडवू शकते. विशेष अतिथी डॉ. सुरेश गोसावी म्हणाले, वैद्यकीय पदवी ही केवळ व्यवसायात प्रवेश मिळवून देणारे साधन नसून मानवतेप्रती अर्पण केलेली आयुष्यभराची बांधिलकी आहे. आधुनिक ज्ञानासोबत रुग्णसेवेतील कौशल्य आणि उच्च नैतिक मूल्ये वैद्यकीय क्षेत्रात अत्यावश्यक आहेत.

कुलपती डॉ. राजेंद्र विखे म्हणाले की, विद्यापीठाकडून पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या कार्यपरंपरेतून विद्यार्थ्यांमध्ये सेवा, प्रेम आणि करुणेची मूल्ये रुजविण्याचा सातत्याने प्रयत्न केला जात आहे. कोविडनंतरच्या जागतिक आरोग्य क्षेत्रातील आव्हाने आणि संधी यांचा सामना करण्यासाठी तरुण पदवीधर सक्षमपणे पुढे येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि अहवाल वाचन विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. डॉ. विष्णू मगरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. दिपीका भालेराव यांनी केले. समारंभात विविध शाखांतील एकूण ३२२ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नैसर्गिक शेतीतील निविष्ठांसाठी एकात्मिक शेती पद्धतीचे मॉडेल फलदायी ठरेल : डॉ. खर्चे




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : रासायनिक खतांच्या अमर्याद वापरामुळे बिघडलेले जमिनीचे आरोग्य, हवामानातील बदल, पाण्याची प्रत याचा परिणाम पिकांच्या उत्पादकतेवर होत आहे. जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी तसेच शेती शाश्वत करण्यासाठी पुणे येथे राज्यपालांच्या पुढाकारातून महाराष्ट्रात प्रथमच नैसर्गिक शेतीवर भव्य कार्यशाळा आयोजित करण्यात आली. नैसर्गिक शेतीसाठी निविष्ठांच्या निर्मितीचा अडसर येऊ नये म्हणून शेतावरच निविष्ठा तयार करावयाच्या आहेत. यासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठाने तयार केलेले एकात्मिक शेती पद्धतीचे मॉडेल फलदायी ठरेल असे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन व आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे विभागीय नैसर्गिक शेती कार्यशाळेचे आयोजन महात्मा फुले कृषी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय सभागृहात करण्यात आले. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी झालेल्या कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून कुलगुरू डॉ. विलास खर्चे बोलत होते. याप्रसंगी आत्माचे संचालक सुनील बोरकर, कृषी संचालक विनयकुमार आवटे, पुणे विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक दत्तात्रय गवसाने, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता (कृषी) डॉ. साताप्पा खरबडे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, प्रकल्प संचालक, आत्मा, अहिल्यानगर प्रदीप लाटे, प्रकल्प संचालक, आत्मा, पुणे सुरज मडके, प्रकल्प संचालक, आत्मा, सोलापूर डॉ. कांताप्पा खोत, कृषीविद्या विभागाचे प्राध्यापक व सेंद्रिय शेती प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. उल्हास सुर्वे, रोमिफ इंडियाचे संस्थापक डॉ. प्रशांत नाईकवाडी, कृषि विज्ञान केंद्र, दहिगावणेचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. शामसुंदर कौशिक, सागर गायकवाड, राजाराम गायकवाड व श्रीरामपूरचे उपविभागीय कृषी अधिकारी प्रवीण गोसावी उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू डॉ. विलास खर्चे आपल्या मार्गदर्शनामध्ये पुढे म्हणाले की शेण, गोमूत्र, पिकांचे अवशेष हे सर्व शाश्वत शेतीसाठी महत्त्वाचे असून त्यासाठी नैसर्गिक शेतीला समजून घेतले पाहिजे. या कार्यशाळेमध्ये सहभागी झालेल्या शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीचे तंत्रज्ञान या कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करणाऱ्या तज्ञांकडून प्रथम समजून घ्या, आपल्या मनामध्ये कोणताही संभ्रम ठेवू नका.

तांत्रिक सत्रामध्ये अहमदाबाद येथील गीर गो शाळेचे संस्थापक गोपाळभाई सुतारीया, डॉ. प्रशांत नाईकवाडी, डॉ. उल्हास सुर्वे व दत्तात्रय शेरकर यांनी नैसर्गिक शेतीशी संबंधीत विविध विषयांवर उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी नैसर्गिक शेतीमध्ये वापरण्यात येणाऱ्या विविध निविष्ठांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दत्तात्रय गवसाने यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उल्हास राक्षे यांनी तर आभार प्रदीप लाटे यांनी मानले. या कार्यशाळेसाठी अहिल्यानगर, पुणे व सोलापूर या विभागातील कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच नैसर्गिक शेती करणारे १५०० शेतकरी उपस्थित होते.

## कै.लालाशेठ बिहाणी विद्यामंदिर प्रशालेचा दहावीचा निकाल ९०.१५ टक्के

### मिसाळ समर्थ ९६.२० गुण मिळवून प्रथम



चि मिसाळ समर्थ संतोष | कु.बडाख आदिती गजानन | चि आघाव अनिकेत रावसाहेब | कु . आघाव आरुषी कोंडाजी | कु. तमनर वैष्णवी शांताराम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : येथील लालाशेठ बिहाणी विद्यामंदिर प्रशालेचा इयत्ता दहावी फेब्रुवारी २०२६ चा निकाल ९०.१५ टक्के लागला असून विद्यालयाने यंदाही उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उज्वल यश मिळवत राहुरी शहराच्या शैक्षणिक परंपरेत मानाचा तुरा रोवला आहे. यावर्षी विद्यालयातून एकूण २६४ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते. त्यापैकी २३८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयाचा एकूण निकाल ९०.१५ टक्के इतका लागला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे पालक, शिक्षक व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यालयातील चि. समर्थ संतोष मिसाळ याने ४८१ गुण मिळवत ९६.२० टक्क्यांसह प्रथम क्रमांक पटकावला. चि. अनिकेत रावसाहेब आघाव याने ४७६ गुणांसह ९५.२० टक्के मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच कु. अदिती गजानन बडाख, कु. वैष्णवी शांताराम तमनर आणि कु. आरुषी कोंडाजी आघाव यांनी प्रत्येकी ४७० गुण मिळवत ९४ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला. विद्यालयाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा सौ. प्रभावतीताई बिहाणी, संस्थेचे सचिव मनोजशेठ बिहाणी, सहसचिव अनुपशेठ बिहाणी, विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास अनाप, उपमुख्याध्यापिका मंजिरी देशपांडे, ज्येष्ठ शिक्षक राहुल जगताप, विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक व नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची मेहनत कारणीभूत असल्याचे विद्यालय प्रशासनाकडून सांगण्यात आले. आगामी काळातही गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रगतीची नवी दिशा देण्याचा संकल्प विद्यालयाने व्यक्त केला आहे.

## दादासाहेब घाडगे पाटील विद्यालयाचा ९४.१० टक्के निकाल



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये संपन्न झालेल्या माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून नेवासाफाटा येथील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित श्री दादासाहेब हरिभाऊ घाडगे पाटील माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल ९४.१० टक्के लागला आहे. येथे परीक्षेसाठी एकूण ६११ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.

प्रीतमराज बागल याने ९१.८० टक्के गुण मिळवत विद्यालयात प्रथम,संस्कृती दगडे हिने ९१.४० टक्के गुण मिळवत द्वितीय, स्नेहल शिंदे हिने ९१.२० टक्के गुण मिळवत तृतीय, हर्षवर्धन मुंडे याने ८९.८० टक्के गुण मिळवत चतुर्थ तर सार्थक जाधव याने ८९.६० टक्के गुण मिळवत पाचवा क्रमांक संपादित केला.

शंभर विद्यार्थी विशेष प्राविण्यामध्ये उत्तीर्ण झालेले असून २१५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहे.

वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा ॲड. श्रीमती सुमतीताई साहेबराव घाडगे पाटील,उपाध्यक्ष ॲड. स्नेहल चव्हाण पाटील,डॉ.श्रुती आमले,चेतन चव्हाण, डॉ.गौरव आमले,विद्यालयाचे प्राचार्य सोपान काळे, उपप्राचार्य शांतीलाल मेहेत्रे,पर्यवेक्षक संजय चौहान, विभाग प्रमुख एकनाथ कापसे, नामदेव ताके,अंजली होन, संतोष निंबाळकर, बाळासाहेब साबळे, दत्तू गर्जे,सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक करून अभिनंदन केले आहे

## माध्यमिक विद्याभवन अमृतनगर शाळेची इ.१० वी ची १००% निकालाची परंपरा कायम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : अमृत सांस्कृतिक मंडळ अमृतनगर, संगमनेर संचलित सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात माध्यमिक विद्याभवन अमृतनगर या विद्यालयाचा एस. एस. सी. परीक्षा मार्च २०२६ चा निकाल १००% लागला आहे. विदयालयाने याही वर्षी १००% निकालाची परंपरा कायम राखली आहे. माध्यमिक विद्याभवन विद्यालयाचा मार्च २०२६ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल १००% लागला असून प्रथम क्रमांक कुमारी अदिती शशिकांत बड ९१.२०% व्दितीय क्रमांक अविनाश दिपक वानखेडे ९०%, तृतीय क्रमांक साक्षी संतोष पुणेकर ८३.८०%, चौथा क्रमांक कुमारी तमन्ना शानुर शेख ८३.४०%, व पाचवा क्रमांक भाग्यश्री निलेश पारधी ८२% या सर्व विद्यार्थ्यांचे सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याचे विद्यमान चेअरमन लोकनेते बाळासाहेब थोरात, विधान परिषदचे सदस्य आमदार सत्यजित तांबे, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन पांडुरंग दामोधर घुले कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, अमृत सांस्कृतिक मंडळाचे कार्याध्यक्ष रामदास तांबडे, सेक्रेटरी संदिप दिघे, खजिनदार भारत देशमुख व सर्व संचालक मंडळ तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका संगिता म्हस्के, प्राथमिक विदयाभवनच्या मुख्याध्यापिका अर्चना आंबरे व शिक्षक वृदं व शिक्षकेतर कर्मचारी आदिंनी अभिनंदन केले. सर्व शिक्षकांचे परिश्रमामुळे व सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात साखर कारखान्याचे सर्व संचालक मंडळ तसेच पदाधिकारी व पालकांचे सहकार्य लाभले. या सर्वांच्या सहकार्या मुळे विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली.

## सोनारांना कोतवाली पोलीस ठाण्यात बेदम मारहाण

### राहुरी पोलीस निरीक्षक व महसूल प्रशासनाला सराफ संघटनेचे निवेदन



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : अहिल्यानगर येथील कोतवाली पोलिस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रिकव्हरी म्हणून एका सराफ व्यापाऱ्याकडून २०० ग्रॅम सोने घेतले. याची विचारणा करण्यासाठी गेलेल्या लोकांना पोलीसांकडून बेदम मारहाण करण्यात आली. ही घटना अतिशय निंदनीय असून या घटनेचा आम्ही निषेध व्यक्त अशी प्रतिक्रिया संजीव उदावंत यांनी दिली.

नगर जिल्ह्यातील सराफांना नगर कोतवाली पोलीस स्टेशन येथील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या अमानुष मारहाणीच्या निषेधार्थ राहुरी येथील सराफ व्यावसायिकांच्या वतीने दि. ८ मे २०२६ रोजी दुकाने बंद ठेवण्यात आली. यावेळी संजीव उदावंत यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. सर्व सराफ व्यावसायिकांच्या वतीने पोलिस निरीक्षक संजय ठेंगे व महसूल प्रशासनाला निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे कि, सुवर्ण समाजातील संजय बुऱ्हाडे, रा. सोनई, संकेत बुऱ्हाडे आणि भागवत अधापुरे यांना कोतवाली पोलिस स्टेशन अहिल्यानगर येथे दि. १६ एप्रिल २०२६ रोजी कलम ४११ अंतर्गत चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना अत्यंत अमानुष पध्दतीने मारहाण केली. सदर पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. असे निवेदनात म्हटले आहे.

दिलेल्या निवेदनावर सराफ संघटनेचे अध्यक्ष रविंद्र उदावंत, सचिन डहाळे, महेश उदावंत, सौरभ भन्साळी, विलास आधापूरे, दिपक नागरे, रोहित आंबीलवादे, अक्षय उदावंत, सिद्धेश भडकवाल, व्ही. जी. उदावंत, कृष्णा उदावंत, गणेश भडकवाल, सचिन मुंडलीक, राजेंद्र दहिवाळ, दिलीप शहाणे, सतिष शहाणे, मनोज आंबिलवादे, श्याम शहाणे, ओंकार भडकवाल, राजेंद्र मुंडलीक, प्रशांत नहार, दादासाहेब भडकवाल, संतोष नागरे, राजेश मैड, विनोद वर्मा, सागर लोळगे, कृष्णा मुंडलीक, भास्कर उदावंत आदिंच्या सह्या आहेत.

## शेळ्या बाजूला घेण्याच्या कारणावरून डिग्रस येथे तरुणाला बेदम मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तूमच्या शेळ्या आमच्या शेळ्यात मिक्स केल्या वरुन आमच्यावर दादागीरी करता काय? असे म्हणुन आरोपींनी श्रीकांत गावडे या तरुणाला शिवीगाळ करुन लाकडी काठी, फायटर व लाथा बूक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना दि. ५ मे रोजी सायंकाळी राहुरी तालुक्यातील डिग्रस येथे घडली.

श्रीकांत भाऊसाहेब गावडे, वय २५ वर्षे, रा. डिग्रस, ता. राहुरी, या तरुणाने राहुरी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, दि. ५ मे २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता मारुती गावडे याने श्रीकांत गावडे याला फोन करून सांगीतले कि, तुझे वडील व माझे वडील शेळ्या चारत असताना त्यांच्या शेळ्या एकमेकात मिक्स झाल्याने ते दोघे एकमेकांना शिवीगाळ करत आहेत. तु पाटाजवळ ये असे सांगीतले. त्यानंतर श्रीकांत गावडे हा पाटाजवळ गेला असता तेथे भाऊसाहेब गावडे व किसन गावडे हे एकमेकांना शिवीगाळ करत होते. तेव्हा श्रीकांत गावडे त्या दोघांना समजावुन सांगत असताना तेथे आरोपी आले व मला म्हणाले की, तुझ्या वडीलांना निट समजावुन सांग ते माझे वडीलांना शिवीगाळ करत आहेत. तुम्ही तूमच्या शेळ्या आमच्या शेळ्यात मिक्स केल्या वरुन आमच्यावर दादागीरी करता काय? असे म्हणुन आरोपींनी शिवीगाळ करुन फायटर व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर श्रीकांत गावडे व त्याचे वडील घरी गेले असता आरोपींनी घरी जाऊन पून्हा काठीने मारहाण केली. तसेच तु व तुझा बाप परत आमचे नादी लागले तर तुम्हाला जिवे मारुन टाकु, अशी धमकी दिली.

घटने नंतर श्रीकांत भाऊसाहेब गावडे याने राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी मारुती किसन गावडे, सुभाष किसन गावडे, किसन कारभारी गावडे, श्रीकांत सुभाष गावडे, सर्व रा. डिग्रस, ता. राहुरी, यांच्यावर मारहाण व धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलीस करीत आहेत.

द•ख•ल

## बेलवंडीच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाचा निकाल ९७.३० टक्के

**बेलवंडी** : बेलवंडी येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाने यंदाच्या एसएससी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत ९७.३० टक्के निकाल लागला. यामुळे विद्यालयाने निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयातील २२३ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते. त्यापैकी २१७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची नोंद केली आहे. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांनी विशेष यश मिळवत शैक्षणिक परंपरेत भर घातली आहे. यामध्ये श्रेया श्रीनिवास जगताप हिने ९४.८० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. सूरज संतोष घोडेकर याने ९३.८० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर तेजस्वी संतोष रायकर हिने ९३.२० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक संपादन केला. विद्यालयाच्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडीचे सदस्य अण्णासाहेब शेलार, विद्यालयाचे ,विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, सरपंच ऋषिकेश शेलार,मुख्याध्यापक, राजेंद्र खेडकर, उपमुख्याध्यापक बापू दिघे, उपसरपंच बाळासाहेब ढवळे, स्कुल कमिटीचे अध्यक्ष गोपीचंद इथापे, ज्ञानदेव हिरवे, पतसंस्थाचे चेअरमन उत्तम डाके, सोसायटीचे चेअरमन विजय काळाने, व्हा. चेअरमन ज्ञानदेव शेलार पर्यवेक्षक,शिक्षकवृंद तसेच पालकांकडून विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या मेहनतीसोबतच शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळे हे यश मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

## ५६ हजार किलो वजनाची ८०० गोण्या सुपारी पकडली

**अहिल्यानगर** : कर्नाटककडून दिल्लीकडे लाल रंगाची सुपारी घेऊन जाणारे दोन ट्रक – पोलिस अधीक्षक एम. सुदर्शन यांच्या पथकाने एमआयडीसी परिसरात पकडले. या कारवाईत ५६ हजार किलो वजनाची ८०० गोण्या सुपारी जप्त करण्यात आली आहे. अपर पोलिस अधीक्षक वैभव – कलबुर्मे, उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे, तसेच एमआयडीसी पोलिसांनी – ही कारवाई केली. लाल रंगाची सुपारीने भरलेले दोन ट्रक ताब्यात घेतले. एका ट्रकमध्ये ३१ हजार ५०० किलो वजनाच्या ४५० गोण्या व दुसऱ्या ट्रकमध्ये २४ हजार ५०० किलो वजनाच्या ३५० सुपारीच्या गोण्या असा एकूण ५६ हजार किलो वजनाच्या ८०० गोण्या जप्त करण्यात आल्या आहेतः अन्न व औषध प्रशासनामार्फत पुढील कारवाई केली जाणार आहे. सपोनि शिशिरकुमार देशमुख, सहायक फौजदार अजय नगरे, पोहेकॉ बाळासाहेब जंबे, सचिन जाधव, भरत बुधवंत, राजु जाधव, महेश मगर, किरण बनसोडे, सागर व्दारके यांचा या पथकात समावेश होता.

## नगरमध्ये ११ मे रोजी शिकाऊ भरती मेळावा

**अहिल्यानगर** : नगर राष्ट्रीय शिकाऊ मेळाव्याअंतर्गत कै. माणिकराव नरसिंगराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बुरूडगाव रोड, अहिल्यानगर येथे ११ मे रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५ या वेळेत शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शिकाऊ उमेदवारी मिळवू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी या मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य के. ए. जहागीरदार यांनी केले आहे. तसेच दहावी व आयटीआय उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रके, शाळा सोडल्याचा दाखला, आधारकार्ड आदी मूळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतींसह मेळाव्यास उपस्थित राहावे, असेही कळविण्यात आले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवानिमित्त चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन

## विद्यार्थी व खुल्या गटात स्पर्धा: शहरभर केंद्रांवर अर्ज उपलब्ध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** सांस्कृतिक मंत्रालय, महाराष्ट्र शासन आणि अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मा.पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवानिमित्त शहरात चित्रकला व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना तसेच नागरिकांना अहिल्यादेवी होळकर यांच्या महान कार्याचा परिचय होणार असून त्यांच्या विचारांचे जतन व संवर्धन करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

स्पर्धेसाठी अर्ज व साहित्य घेण्याची व्यवस्था शहरातील विविध ठिकाणी करण्यात आली आहे .दि. ११ मे ते १५ मे या कालावधीत स्पर्धकांनी फॉर्म संबंधित केंद्रांवरून घ्यावेत. तर २० मे ते २२ मे या कालावधीत पूर्ण केलेले चित्र किंवा निबंध पुन्हा त्याच केंद्रांवर जमा करावेत, अशी माहिती पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने देण्यात आली आहे.

स्पर्धेसाठी पेपर कोणार्क हार्डवेअर तपोवन रोड, सूर्यकांत फर्निचर (श्रीराम चौक), अरुणोदय मेडिकल (भिस्तबाग चौक), प्रा. अशोक डोळसे यांचे निवासस्थान (साधना सोसायटी, प्रोफेसर कॉलनी), पारिजात कॉर्नर (पारिजात चौक), गणेश कर्टन (नायरा पंपजवळ, बालिकाश्रम रोड), शिंदे डायग्नोस्टिक सेंटर (बालिकाश्रम रोड), जाधव मळा येथील उपमहापौर ड. धनंजय जाधव यांचे संपर्क कार्यालय, सिद्धेश्वर मेडिकल (विशाल गणपती मंदिर, माळीवाडा), महालक्ष्मी मल्टी टेस्ट सोसायटी (बुरुडगाव रोड, चाणक्य चौक), अक्षय सुगंधालय (डाळ मंडई), नगरसेवक सुजय मोहिते यांचे संपर्क कार्यालय (लिंक रोड, केडगाव), जलाराम बेकर्स (केडगाव), नंदकुमार गुजराती (भिंगारवाला चौक) तसेच गुजराती भोजनालय शेजारी अशा अनेक केंद्रांवर फॉर्म उपलब्ध असणार आहेत.

चित्रकला स्पर्धेत इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेला घाट, अहिल्यादेवी होळकर यांचे व्यक्तिचित्र आणि त्यांच्या जीवनातील प्रसंग हे विषय देण्यात आले आहेत. तर महाविद्यालयीन व खुल्या गटासाठी अहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेले शिवमंदिर, त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांच्या स्मारकाची कल्पना हे विषय निश्चित करण्यात आले आहेत.

निबंध स्पर्धेत शालेय गटासाठी अहिल्यादेवी होळकरांचे जीवन – राष्ट्रीय एकात्मतेची यशोगाथा आणि अहिल्यादेवी होळकर – एक कुशल संघटक हे विषय देण्यात आले. खुल्या गटासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य आणि त्यांचे जीवनचरित्र – महिला सबलीकरणाचे उदाहरण हे विषय आहेत.


या स्पर्धांमधून विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाची जाणीव, सर्जनशीलता आणि विचारप्रवृत्ती विकसित होण्यास मदत होणार आहे. तसेच अहिल्यादेवींच्या कार्याचा अभ्यास करताना समाजासाठी प्रेरणादायी विचार आत्मसात करण्याची संधीही मिळणार आहे.

अधिक माहितीसाठी पुष्कर कुलकर्णी (८८३०१५९०८३), चंद्रकांत तागड (९४२२२२६१५३२), अशोक डोळसे (९८९०२६९६९८) तसेच राधाकृष्ण जोशी (७९७२२३६८४४) यांच्याशी संपर्क साधावा.

या सांस्कृतिक उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन अहिल्यादेवींच्या कार्याला अभिवादन करावे, असे आवाहनही आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल ८९.०४ टक्के

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



निधी इप्पलपेल्ली ममता चौधरी वैष्णवी चोथे

**अहिल्यानगर :** दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा १०वी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२६ चा निकाल ८९.०४ टक्के लागला असून विद्यालयाच्या यशस्वी परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. विद्यार्थ्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण परिश्रमांना आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाला यश मिळाल्याने परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या परीक्षेत विद्यालयातून कु. निधी अविनाश इप्पलपेल्ली हिने ८३.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कु. ममता नवराम चौधरी हिने ८०.२० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला, तर कु. वैष्णवी पांडुरंग चोथे हिने ७४ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. याशिवाय इतर अनेक विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा विजया चंद्रकांत रेखे, सचिव किरण वैकर, उपाध्यक्ष चंद्रशेखर कुलकर्णी, खजिनदार उमेश चंद्रकांत रेखे, माजी अध्यक्ष दि. ना. जोशी, कार्यकारी सदस्य महेश चंद्रकांत रेखे, उदयकुमार भणगे, उमेश नगरकर तसेच विद्यालयाचे प्राचार्य सुनिल पंडित यांनी अभिनंदन केले. तसेच संस्थेचे सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विद्यालयाच्या या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे मार्गदर्शन हे प्रमुख घटक असल्याचे प्राचार्य सुनिल पंडित यांनी सांगितले. पुढील काळातही अधिक गुणवंत विद्यार्थी घडवण्याचा संकल्प संस्थेने व्यक्त केला आहे.

## नागापूर येथे अवैध माती व गौण खनिजाचे उत्खनन : शेतकऱ्याची नुकसान भरपाई ची मागणी

### कर्जत तहसील समोर आमरण उपोषणाचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कर्जत :** कर्जत तालुक्यातील नागापूर येथील शेतकरी नानासाहेब गोपीनाथ सावंत, गोपीनाथ पांडुरंग सावंत या शेतकऱ्यांच्या शेतालगत असलेल्या गट क्रमांक ६१ मधून माती व गौण खनिजाची मोठ्या प्रमाणात उत्खनन करण्यात आले आहे..यामुळे लगतची असलेली शेती नष्ट झाली आहे.

गौण खनिजाचे झालेले उत्खनन याचा दि.२५ फेब्रुवारीला पंचनामा होऊन देखील संबंधितावर कुठल्याही प्रकारची कारवाई झाली नाही. या अन्यायाविरोधात कर्जत तहसिल कार्यालयासमोर दि.११ मे रोजी आमरण उपोषण करण्याचा इशारा शेतकरी सावंत यांनी दिला आहे.

शेतकरी सावंत यांनी दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, नागापूर ता.कर्जत येथील गट क्रमांक ६० मध्ये गोपीनाथ सावंत यांचे नावे शेत जमीन आहे. या गटाच्या दक्षिण बाजूला असलेल्या शेतकऱ्याने गट क्रमांक ६१ मध्ये दक्षिण पूर्व, पश्चिम बाजूने असे मोठी खोदाई करून माती व गौण खनिजाचे मोठ्या प्रमाणात उत्खनन केले आहे. यामुळे माती ढासळत असल्याने माझ्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.या उत्खननाच्या ठिकाणी दि.२ फेब्रुवारी रोजी पंचनामा करण्यात आला. मात्र, संबधितावर कोणत्याही प्रकारे दंडात्मक अगर फौजदारी कारवाई करण्यात आलेली नाही. माझ्या शेतीची झालेली नुकसान भरपाई ही दिलेली नाही. उत्खनन करणाऱ्या व्यक्तीवर तात्काळ फौजदारी स्वरूपाची कारवाई व्हावी, तसेच पंचनाम्याची अंमलबजावणी व्हावी. सर्व्हे नंबर ६० व ६१ च्या बांधावरून मुख्यमंत्री पाणंद रस्ता योजनेअंतर्गत रस्ता मिळावा, आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. अन्यथा कर्जत तहसील कार्यालयासमोर दि.११ मे रोजी शेतकरी सावंत यांनी आपल्या कुटुंबीयांसह आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

निवेदनाच्या प्रति जिल्हाधिकारी, कर्जतचे प्रांताधिकारी ,तहसीलदार व कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक व मिरजगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक यांना देण्यात आले आहेत.

# नेहरू मार्केट येथे भव्य व्यापारी संकुल व भाजी मार्केट विकास कामाचे भूमिपूजन संपन्न

## अहिल्यानगर शहरात पब्लिक पार्क उभे करा – पालकमंत्री विखे पाटील



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** चितळे रोड येथील नेहरू मार्केट परिसरात भव्य व्यापारी संकुल व भाजी मार्केट विकास कामाचे भूमिपूजन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या विकासकामामुळे शहराच्या मध्यवर्ती बाजारपेठेला आधुनिक स्वरूप मिळणार असून, पारंपरिक वारसा जपत नव्या युगातील सुविधा उपलब्ध होणार आहेत.

यावेळी बोलताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, अहिल्यानगर शहर विकास कामातून वेगाने बदलत आहे. नेहरू मार्केटचा अनेक दिवसांचा प्रश्न मार्गी लागत असून त्याला एक इतिहास आहे, तो टिकून ठेवण्याचे काम आपल्या सर्वांचे आहे. जुन्या शहरांमध्ये आजही जुन्या पाऊलखुणा दिसतात. माझे आजोबा पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील जिल्हा बँकेचे चेअरमन होते, त्या काळात आम्ही नेहरू मार्केट जवळ मुरमुऱ्या घेण्यासाठी येत असू. सुट्टीत येथे फिरायला यायचो.

ते पुढे म्हणाले की, आजच्या काळात फास्ट फूड, मॉल संस्कृती आणि ऑनलाइन व्यवहार वाढले आहेत. त्यापुढे आता एआय (–ख) आले आहे. यामुळे भविष्यात बेरोजगारीचे संकट वाढण्याची शक्यता आहे आणि त्याचा परिणाम शहरांवर होणार आहे. त्यामुळे शहराची संस्कृती टिकवायची असेल तर पब्लिक पार्क उभे करणे गरजेचे आहे. त्यासाठी निधीही उपलब्ध करून दिला जाईल. आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात इमारती व सार्वजनिक सुविधा शहराच्या विकासासाठी महत्त्वाच्या आहेत. शेतकऱ्यांसाठी सक्षम मार्केट उभे केले तर नागरिकांना ताजा भाजीपाला मिळेल. शहराची अर्थव्यवस्था शेतकऱ्यांवर अवलंबून आहे. आमदार संग्राम जगताप व डॉ. सुजय विखे पाटील शहर विकासासाठी पुढाकार घेत आहेत. शहराला चांगली टीम मिळाली असून सौंदर्यात दिवसेंदिवस भर पडत आहे. आयुक्त यशवंत डांगे यांचे कामही समाधानकारक आहे.

**इतिहास जपत आधुनिक विकास; शहराच्या अर्थकारणाला मिळणार नवी चालना**

या भूमिपूजन कार्यक्रमाला आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ड. धनंजय जाधव, आयुक्त यशवंत डांगे, स्थायी समिती सभापती पैलवान सुभाष लोंढे, महिला बालकल्याण उपसभापती वर्षा सानप, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर गणेश भोसले, अनिल बोरुडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगरसेवक कुमारसिंह वाकळे, निखिल वारे, संजय चोपडा, सुरेश बनसोडे, मनोज कोतकर, महेश तवले, प्रकाश भागानगरे, प्रा. माणिक विधाते, बाळासाहेब पवार, गणेश कवडे, करण कराळे, पुष्कर कुलकर्णी, अरविंद शिंदे, महेश लोंढे, नगरसेविका मयुरी जाधव, शितल ढोणे, आशाताई डागवाले, सुजाता पडोळे, विजय परदेशी, विनायक देशमुख, अजय ढोणे, दत्ता गाडळकर, रेवनाथ पवार, सागर बोरुडे आदी उपस्थित होते.

यावेळी आ. संग्राम जगताप म्हणाले की, अहिल्यानगर शहरामध्ये राजमाता जिजाऊ शहाजीराजे भोसले हॉस्पिटलचे काम पूर्णत्वास आले असून खाजगी हॉस्पिटलला लाजवेल अशी इमारत उभी राहिली आहे. ही नगरकरांच्या मालकीची आहे. आता दुसरी मोठी इमारत नेहरू मार्केटच्या ठिकाणी उभी राहत आहे. येथे भाजी मार्केट व व्यापारी संकुल तयार होणार आहे. पूर्वीचा इतिहास जपण्यासाठी इमारतीवर घड्याळ बसवण्यात येणार असून ते नगरचे प्रतीक ठरेल. स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या माध्यमातून मोठा निधी मिळाला आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे मार्गदर्शनही लाभत आहे.

महापौर ज्योतीताई गाडे यांनी सांगितले की, चितळे रोड येथील नेहरू मार्केट चार मजली इमारतीच्या स्वरूपात उभारले जाणार आहे. ग्राउंड फ्लोअरवर ५३ भाजी ओटे आणि ५७ गाळे असतील. या प्रकल्पासाठी अंदाजे ९ कोटी ३४ लाख रुपयांचा खर्च येणार आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयुक्त यशवंत डांगे यांनी केले तर आभार प्रदर्शन उपमहापौर ड. धनंजय जाधव यांनी मानले.

# गायकवाड कॉलनीत रस्ते काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ

## विकसित अहिल्यानगरच्या दिशेने ठोस पावले – आ. जगताप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ६ मधील गायकवाड कॉलनी येथे आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून रस्ता काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कामामुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला रस्त्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे.

या कार्यक्रमास नगरसेवक मनोज दुल्लम, नगरसेवक करण कराळे, पुष्कर कुलकर्णी, माजी नगरसेविका नलिनी गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, आनंद लहामगे, मोहन गायकवाड, पी. आर. कुलकर्णी, प्रमोद मुळे तसेच प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी आ.संग्राम जगताप यांनी सांगितले की,अहिल्यानगर शहरातील नागरिकांनी मला बारा वर्षांपूर्वी आमदार म्हणून सेवा करण्याची संधी दिली. त्या विश्वासाच्या जोरावर राज्य सरकारचा मोठा निधी उपलब्ध करून देत नियोजनबद्ध आणि कायमस्वरूपी विकासकामे मार्गी लावली आहेत. यामध्ये रस्ते काँक्रिटीकरण, स्ट्रीट लाईट, हॉस्पिटल, स्पोर्ट कॉम्प्लेक्स, पाणी प्रश्न, ड्रेनेज लाईन, सीना नदी सुशोभीकरण तसेच डीपी रस्ते व कॉलनी अंतर्गत रस्त्यांची कामे समाविष्ट आहेत.

ते पुढे म्हणाले की, विकसित अहिल्यानगरची वाटचाल आता अधिक वेगाने सुरू आहे. प्रत्येक विकासाचा प्रश्न आम्ही टप्प्याटप्प्याने हाती घेऊन कायमस्वरूपी मार्गी लावत आहोत. शहरात सुरू असलेली विकासकामे पाहून नागरिक समाधान व्यक्त करत आहेत. ब्रँडेड उत्पादनांची दालने सुरू झाल्यामुळे शहराच्या अर्थकारणाला चालना मिळत असून रोजगार निर्मितीही वाढत आहे. नागरिकांनी सुचवलेली विकासकामे तातडीने पूर्ण केली जात आहेत. नागरिकांना सोबत घेऊन विकासाची कामे केली जात आहेत.

यावेळी नगरसेवक करण कराळे म्हणाले की, प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही चारही नगरसेवक एकत्रितपणे काम करत आहोत. गायकवाड कॉलनीतील रस्त्याचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता, तो आता आ. संग्राम जगताप यांच्या माध्यमातून पूर्ण होत आहे. यामुळे परिसराला नवा आणि सुशोभित चेहरा प्राप्त होईल. पुढील काळात प्रभाग समस्या मुक्त करण्याचा आमचा संकल्प आहे.

कार्यक्रमादरम्यान गायकवाड कॉलनीतील नागरिकांनी विकासकामांचे स्वागत करत समाधान व्यक्त केले. आनंद लहामगे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**जाहीर नोटीस**

अ‍ॅड. विजय व्ही. तांबे
नि.नं.९ ने. ता २९/६/२०२६

**राहुरी येथील मे. सिव्हील जज्ज साहेब ज्यु.डि. यांचे कोर्टात.**

वारस चौकशी अर्ज नं. ०९/२०२६

**अर्जदार**– बाबासाहेब संपत गागरे वय – ४५ वर्षे, धंदा – शेती, रा. कानडगाव, ता, राहुरी, जि. अहिल्यानगर– **सामनेवाले :** कोणी ही नाही.

अर्ज–बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट चे क. २(८) प्रमाणे. ज्याअर्थी, अर्जदाराचे सख्खे चुलते भागवत किसन गागरे व चुलती नेहाबाई भागवत गागरे यांना मुलबाळ नसलेने त्यांनी अर्जदारास मानसपुत्र मानले होते व अर्जदार हाच त्यांच्या जिवनावश्यक गरजा पूर्ण करीत होता. मयत भागवत किसन गागरे यांचे नावावर मौजे कानडगाव हद्दीत खालील प्रमाणे ग्रामपंचायत मिळकत होती.

| अ. नं. | रस्त्याचे नाव | मालमत्ता क्र. | मालमत्तेचे वर्णन | क्षेत्रफळ चौ.मी./ चौ.फुट |
|---|---|---|---|---|
| २५७ | गावठाण कानडगाव | १७८/१. सिटी सर्व्हे नं.२१४ | पडसर/खुली जागा लांबी २० फुट रुंदी १५ फुट | २७–८७ (३०० चौ. फुट) |

सदरची मिळकत अर्जदाराचे चुलते भागवत किसन गागरे हे मयत झाले नंतर अर्जदाराची चुलती नेहाबाई भागवत गागरे हिचे नावावर आलेली आहे. तिने सदरची मिळकत अर्जदारास कायम देण्याची इच्छा प्रदर्शित केली होती. परंतु अर्जदाराची चुलती नेहाबाई भागवत गागरे ही ता. ११/१२/२०२४ रोजी मयत झालेली आहे. त्यानंतर सदरची मिळकत अर्जदाराचे नावावर होणे साठी अर्जदाराने ग्रामपंचायत कानडगाव यांचे कडे अर्ज दिला असता सदरची मिळकत अर्जदार यांचे नावावर होणे साठी मे. कोर्टाचे वारस सर्टीफिकेटची मागणी करण्यात आली म्हणुन अर्जदाराचे नावाने वारस सर्टिफिकेट मिळणे साठी अर्जदाराने या मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी, अर्जदार हे मयत भागवत किसन गागरे व मयत नेहाबाई भागवत गागरे यांचे वारस नाहीत असे कुणास म्हणावयाचे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासुन ३० दिवसाचे आत या मे. कोर्टात स्वतः अगर वकीला मार्फत हजर होवुन आपल्या योग्य त्या हरकती कागदपत्रासह कळवाव्यात. सदरहु मुदतीत कोणाची ही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार न आल्यास अर्जदार यांना वारस सर्टिफिकेट देणे बाबत मे. कोर्ट योग्य तो आदेश करतील याची या जाहीर नोटीसीने नोंद घेण्यात यावी. ही जाहीर नोटीस आज ता.०७ माहे ०५ सन २०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली असे. कळावे.

**तयार करणार.**
**कामगिरी क्लार्क. राहुरी कोर्ट ३**

शिका

**सही**
**हुकुमावरुन.**
**सहाय्यक अधिक्षक. राहुरी कोर्ट**

नेमलेली ता. २०/०६/२०२६ **जाहीर नोटीस**

जा.क्र. २/५३/ २०२६
वारस चौकशी अर्ज नं. २०/२०२६

ॲडव्होकेट श्री. एस. ए. पांडे,
निशाणी नं. ६
दिनांक ०७/०५/२०२६

**श्रीरामपुर येथील मे. सिव्हील जज्ज साहेब (ज्यु. डी) यांचे कोर्टात**

**अर्जदार –** गितांजली अनंतकुमार नागले, वयः ३६ वर्ष, धंदा : घरकाम व स्वस्त धान्य दुकान, रा. मु. मालुंजा बुद्रुक, पो. पढेगांव, ता. श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर, मो. ९९७५५७५००१

**विरुध्द :** १. श्रीमती. शोभा अनंतकुमार नागले, वय : ६० वर्ष, धंदा : घरकाम, रा. मु. मालुंजा बुद्रुक, पो. पढेगांव, ता. श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर, २. कु. दिपाली अनंतकुमार नागले, वय : ३३ वर्ष, धंदा घरकाम, रा. मु. मालुंजा बुद्रुक, पो. पढेगांव, ता. श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर, ३. सौ. वैशाली नंदकिशोर कर्पे, वय : ३९ वर्ष, धंदा घरकाम, रा. १/४६, सिता सदन, डि एल. रोड, काळाचौकी, मुंबई ४०००३३.

**सा. वाला** अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे चॅप्टर ८ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेकामी

याकामी अर्जदाराचा अर्ज असा की, १. अर्जदार व सामनेवाला नं २ व ३ यांचे वडील व सा.वाला नं १ यांचेपती अनंतकुमार प्रभाकर नागले यांचा दिनांक १४/११/२०२५ रोजी मॅक केअर हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे मृत्यु झालेला आहे. २. मयत अनंतकुमार प्रभाकर नागले यांना अर्जदार व सामनेवाला यांचे व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. केवळ अर्जदार व सामनेवाला हेच मयताचे कायदेशिर वारसदार आहेत. ३. मयत अनंतकुमार प्रभाकर नागले हे हयात असतांना त्यांचे नावाने रास्त भाव रेशन दुकान (स्वस्त धान्य) असुन त्याचा प्राधिकार पत्र क्रमांक ६९/८८ (जुना नंबर २३१८४) असा होता व आहे. सदर रास्त भाव दुकानात येणारे धान्य वाटपाचे काम मयत अनंतकुमार प्रभाकर नागले हे मयत होण्यापुर्वी पावेतो करीत होते. सदर दुकानाचे ग्राहकांना धान्य वाटप करणेकामी मयत अनंतकुमार प्रभाकर नागले यांचे नावावरील परवाना मयताचे कायदेशिर वारस म्हणुन अर्जदाराचे नावावर करणेकामी संबंधीत अन्न व नागरी पुरवठा विभागा मार्फत अर्जदार यांना वारस दाखल्याची मागणी केल्याने वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्जदार यांनी प्रस्तुतचा वारस चौकशी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन ३० दिवसांचे आत स्वत: अगर माहीतगार वकिलांकरवी दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, श्रीरामपुर या मे. कोर्टात हजर होवुन योग्य त्या पुराव्यानिशी हरकत नोंदवावी अन्यथा पुढील आदेश केले जातील. आज दि. ७ माहे ५ सन २०२६ रोजी माझे सहीनिशी व मे. न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही**
**सहाय्यक अधिक्षक,**
**सह दिवाणी न्यायालय**
**क. स्तर श्रीरामपुर**

शिका

**सही**
**बेंच क्लार्क,**
**१ ले सह दिवाणी न्यायालय**
**क. स्तर श्रीरामपुर**

# राष्ट्रवादी शहर पक्ष कार्यालयात महिलांसाठी एसटी स्मार्ट कार्ड शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती** :महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भारतातील सर्वाधिक मताधिक्याने विजयी आमदार म्हणून निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष बारामती शहराच्या वतीने

## महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

महिलांसाठी विशेष एसटी स्मार्ट कार्ड शिबिराचे आयोजन (दि:८) रोजी करण्यात आले आहे. महिलांना सवलतीच्या दरात एसटी प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालय, शारदा प्रांगण येथे सुरू असलेल्या या शिबिराचे उद्घाटन बारामती नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सचिन सातव तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष ॲड. किरण इंगळे यांच्या हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर युवक अध्यक्ष अभिजीत घाडगे, राष्ट्रवादी शहर पक्ष कार्यालयातील जनसंपर्क अधिकारी (पीआरओ) सुरज देवकाते, विद्यार्थी अध्यक्ष मेघराज माने, उपाध्यक्ष अन्सारभाई आत्तार, सुधीर पोद्दार, शैलेश वनवे,नवनाथ अपुणे, शब्बीरभाई शेख, अश्विनी तावरे, हेमल शहा, ॲड. रमेश कोकरे,योगेश पवार, सुभाष मोहिते यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

उपस्थित मान्यवरांनी महिलांसाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाची सुरुवात दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार तसेच युवा नेते जय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे ग्रामीण व शहरी भागातील महिला प्रवाशांना मोठा लाभ होणार असल्याचे सांगण्यात आले. शुक्रवार दि. ८ मे ते रविवार दि. १० मे २०२६ या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत हे शिबिर सुरू राहणार आहे. या शिबिरामध्ये १२ वर्षांवरील प्रत्येक युवती व महिलांसाठी एनसीएमसी (छउचउ) स्मार्ट कार्ड उपलब्ध करून देण्यात

**महिलांसाठी एसटी स्मार्ट कार्ड शिबिर १० मे पर्यंत सुरू**

**''बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालय, शारदा प्रांगण येथे महिलांसाठी आयोजित करण्यात आलेले विशेष एसटी स्मार्ट कार्ड शिबिर शुक्रवार दि. ८ मे ते रविवार दि. १० मे २०२६ या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. १२ वर्षांवरील प्रत्येक युवती व महिलांसाठी एनसीएमसी (छउचउ) स्मार्ट कार्ड उपलब्ध करून देण्यात येत असून, कार्डासाठी केवळ १३० रुपये शुल्क आकारले जात आहे. कार्ड काढण्यासाठी आधार कार्ड सोबत आणणे तसेच संबंधित महिलांनी स्वतः उपस्थित राहणे आवश्यक असल्याचे आवाहन बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष ॲड. किरण इंगळे यांनी केले आहे.''**



येत असून, एसटी प्रवासासाठी हे कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. महिलांना सवलतीच्या दरात हे कार्ड उपलब्ध करून देण्यात येत असून, कार्डासाठी केवळ १३० रुपये शुल्क आकारले जात आहे. विशेष म्हणजे हे कार्ड एकदाच काढायचे असून त्याला कोणतीही कालमर्यादा नसल्याने ते कायमस्वरूपी वैध राहणार आहे. कार्ड काढण्यासाठी महिलांनी आधार कार्ड सोबत आणणे तसेच स्वतः उपस्थित राहणे आवश्यक असल्याची माहिती शहराध्यक्ष ॲड. किरण इंगळे यांनी दिली. या उपक्रमामुळे महिलांना एसटी प्रवास अधिक सुलभ होणार असून शासनाच्या सवलतींचा थेट लाभ मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

---

**द • ख • ल**

## एस.एस.सी.परीक्षेत श्री ज्ञानेश्वर विद्यालयाचे घवघवीत यश

**आळंदी** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या एस.एस.सी.परीक्षेत श्री ज्ञानेश्वर विद्यालयाने यंदाही उल्लेखनीय यश संपादन करत गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाचा निकाल तब्बल ९९.२० टक्के लागला असून विद्यार्थ्यांच्या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यालयातील दहावीच्या एकूण ४५५ विद्यार्थ्यांपैकी ४५३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून दोन विद्यार्थ्यांचा निकाल राखीव आहे. विशेष म्हणजे दिव्यांग विभागाचा निकालही नेहमीप्रमाणे शंभर टक्के लागला आहे. या निकालात ज्ञानेश्वरी प्रवीण पगार हिने ९५.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. यश किसन टोणपे याने ९४.६० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर पूजा जनार्दन बाबर आणि तन्मयी कृष्णा पवार यांनी ९४ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला.

या यशाबद्दल यशस्वी विद्यार्थी, पालक, प्राचार्य किसन राठोड, उपप्राचार्य प्रशांत सोनवणे, पर्यवेक्षिका अनिता पडळकर, अनुजायीनी राजहंस, हेमांगी उपरे तसेच सर्व शिक्षकांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळे हे यश शक्य झाल्याची भावना यावेळी सचिव अजित वडगावकर यांनी व्यक्त केली आहे.

## अत्रे प्रतिष्ठानची १०० टक्के निकालाची परंपरा कायम

**माळशिरस** : आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान , पुरंदर संचलित नामदेव गंगाराम शिंगाडे विद्यालय, गुरोळी या विद्यालयाचा दहावी परीक्षेचा निकाल १००% लागला. या विद्यालयाची १००% निकालाची परंपरा सलग २१ वर्षे आहे. परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण विद्यार्थी वेदांत श्रीकांत खेडेकर ९१.८०% , द्वितीय क्रमांक संदेश छबन खेडेकर ८४% , तृतीय क्रमांक हर्षदा सुनील जाधव ८२.२० % यांनी यश संपादन केले. न्यू इंग्लिश स्कूल , जेऊर या विद्यालयाचा निकाल १००% लागला असून प्रथम क्रमांक अनुष्का गोरक्षनाथ तांबे ८९.२०, सायली सचिन सांगळे ७५.२० , तृतीय क्रमांक कार्तिकी राहुल गोसावी ७३.४०% या विद्यार्थ्यांनी यश मिळविले.

न्यू इंग्लिश स्कूल, अष्टापुर विद्यालयाचा निकाल ९८.३६ % लागला असून प्रथम क्रमांक ईश्वरी आप्पासाहेब जगताप ८९.६०%, द्वितीय क्रमांक अनुष्का महेश गायकवाड ८६.८०% , तृतीय क्रमांक सोहम घनश्याम जगताप ८६.६०% या विद्यार्थ्यांनी यश मिळविले. आचार्य प्र.के. अत्रे विद्यालय, पिंपळे या विद्यालयाचा निकाल ९०% लागला असून प्रथम क्रमांक श्रुती संभाजी पोमण ८४% , द्वितीय क्रमांक सृष्टी पोमण ८१.६० % व तृतीय क्रमांक आयुषी दीपक बोरकर ७५.४०% गुण मिळवत सर्व विद्यार्थ्यांनी एस.एस.सी परीक्षेत नेत्रदीपक कामगिरी करत यश संपादन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष विजयराव कोलते, सचिव शांताराम पोमण, शाळा समिती व ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले.

## शारदाबाई पवार विद्यानिकेतनचा अभिमान, बारामतीत वर्चस्व!

**बारामती** : पुणे विभागाने घेतलेल्या एच.एस.सी. बोर्ड फेब्रुवारी २०२६ परीक्षेत शारदानगर येथील शारदाबाई पवार विद्यानिकेतन कनिष्ठ महाविद्यालयाने विज्ञान शाखेत १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली.

कु. सिद्धी बाबासाहेब ढवळे हिने ९३.८३ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. तसेच गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून राज्यात प्रथम येण्याचा मान मिळविला. कु. धनश्री कालिदास कुबेर हिने ९३.१७ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला तर कु. आकांक्षा ज्ञानेश्वर नप्ते हिने ९२ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला. याशिवाय, आदित्य धनराज बावधनकर आणि कु. उत्कर्षा गोरक्षनाथ नवले यांनी अनुक्रमे माहिती तंत्रज्ञान आणि कृषी विज्ञान व तंत्रज्ञान या विषयांत १०० पैकी १०० गुण मिळवून राज्यात प्रथम येत महाविद्यालयाचा गौरव वाढविला. याबरोबरच पुढील विद्याथ्यर्थ्यांनीही या निकालात उत्कृष्ट गुण मिळविलेः संयुक्ता उदय काकडे ८९.८३ टक्के, साईराज किरण महाडिक ८९.५० टक्के, यशराज विशाल शिंदि–८८.८३ टक्के, राज राहूल शेरकर ८७.८३ टक्के तन्वी कैलास होनमाने ८७.३३ टक्के , ऋतुजा सतिश पायघन व प्रांजली विनोद ढोरे– ८७ टक्के , आकांक्षा अमोल घनवट, सुरज संतोष सांगळे आणि सार्थक संजय विधाते ८६.८३ टक्के या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व प्राध्यापकांचे अभिनंदन संस्थेचे चेअरमन. राजेंद्र पवार, विश्वस्त सुनंदा पवार, संस्थेचे सीईओ निलेश नलावडे, एच. आर. गार्गी दत्ता, समन्वयक प्रशांत तनपुरे, मुख्याध्यापक सुर्यकांत मुंढे व विभागप्रमुख . योगेश झणझणे यांनी केले.

## दिवे येथील गोडाऊनला भीषण आग

**दिवे प्रतिनिधी** : दिवे ( ता. पुरंदर ) येथील गोडाऊनला भीषण आगीत सुमारे पंधरा लाख रुपयांचे मांडव साहित्य जळून खाक झाले. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली. पालखी महामार्गावर दिवे येथील श्रीरंग कोंडिबा झेंडे यांच्या मालकीचे गोडाऊन असून ते नितीन शेंडकर यांना भाडेतत्त्वावर देण्यात आले होते. या गोडाऊनमध्ये शेंडकर यांनी मांडवासाठी लागणारे साहित्य ठेवले होते. सदर गोडाऊन शेजारी एक अनधिकृत होर्डिंग उभारण्यात आले होते. ग्रामपंचायतीने नोटीस दिल्यानंतर संबंधित होर्डिंग अर्धवट काढण्यात आले होते. शुक्रवारी सकाळी हे होर्डिंगचे साहित्य काढण्यासाठी काही कामगार आले होते. मात्र,यावेळी सुरक्षिततेची काळजी घेण्यात आली नसल्याचे सांगितले. जात आहे.यावेळी वेल्डिंगच्या ठिणग्या शेजारील गोडाऊनवर पडल्याने अचानक आग लागली. उन्हाच्या तीव्र कडाक्यात आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केले. गोडाऊनमधील मांडव साहित्य व गोडाऊनचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. स्थानिक नागरिकांनी तातडीने ११२ क्रमांकावर संपर्क साधला. यावेळी निलेश पवार यांनी तातडीने सासवड नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाला माहिती दिली. अग्निशमन दल व स्थानिक नागरिकांच्या मदतीने आग आटोक्यात आणण्यात यश आले. यावेळी निशांत भोंडे, जगदीश भोंडे व बिना भोंडे यांनी आग विझवण्यासाठी विशेष प्रयत्न केले. तसेच पोलीस पाटील बाळासाहेब झेंडे, सरपंच रूपेश राऊत व ग्रामसेवक गणेश सुतार यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.



---

## आदर्श माध्यमिक विद्यालय जारकरवाडी दहावीचा निकाल ९४ टक्के

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**जारकरवाडी**, ता. आंबेगाव : राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्र संचलित आदर्श माध्यमिक विद्यालय, जारकरवाडी (ता. आंबेगाव, जि. पुणे) या विद्यालयाचा सन २०२५–२६ च्या इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल ९४ टक्के लागला असल्याची माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक शशिकला वाघमारे यांनी दिली विद्यालयाच्या यशाबद्दल जारकरवाडी परिसरातून यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. परीक्षेत प्रथम पाच क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत : १) सार्थक विजय भांड – ९२.२ टक्के २) कु. अक्षदा बाळू वनवे – ९०.६ टक्के ३) सार्थक नामदेव भांड – ८७.६ टक्के ४) कु. दुर्गा पंढरीनाथ लबडे – ८५.२० टक्के ५) कु. सानिका संतोष लबडे – ८१.४० टक्के ६) कु. कार्तिकी बाळासाहेब भोजणे – ८१.२० टक्के

विद्यालयाच्या या यशाबद्दल सर्व गुणवंत विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक व पालकांचे जारकरवाडी ग्रामस्थांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापक शिक्षकवृंदांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल समाधान व्यक्त केले.

---

# पुणे हे आता 'म्युझिक कॉन्सर्टचे शहर'

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे** : पुणे शहराची ओळख आता फक्त शिक्षणनगरी किंवा सांस्कृतिक राजधानी अशी मर्यादित राहिलेली नाही, तर पुणे हे आता 'म्युझिक कॉन्सर्टचे शहर' म्हणूनही ओळखले जात आहे. रंगबिरंगी रोषणाई, सेलिबिटी कलाकारांचे सुरेल सादरीकरण अन्‌ त्यावर थिरकणारी तरुणाई असे चित्र कॉन्सर्टसमध्ये दिसत असून, ए. आर. रहमान यांच्यापासून ते अरजित सिंग यांच्यापर्यंत अशा विविध कलाकारांच्या कला सादरीकरणाची पर्वणी तरुणाईला अनुभवयाला मिळत आहे आणि पुण्यातील प्रत्येक कॉन्सर्ट हा तरुणाईसाठी एक 'म्युझिकल फेस्टिव्हल' ठरत आहे. दर महिन्याला अंदाजे १० कॉन्सर्ट आयोजित होत असून, ३० ते ४५ संस्था, इव्हेंट कंपन्या या सांगीतिक कार्यक्रमांची धुरा सांभाळत आहेत. बाणेर, कोरेगाव पार्क, विमाननगर, कल्याणीनगर, हडपसर अशा विविध भागांतील मैदाने, मॉल्स आणि क्लबमध्ये अशा विविध ठिकाणी लाईव्ह म्युझिकचा हा जल्लोष रंगत आहे. विशेष म्हणजे केवळ पुणेकर तरुणाईच नव्हे, तर राज्यभरातील तरुणाई 'वीकेंड प्लॅन' म्हणून पुण्यातील कॉन्सर्टला येत आहे.

सुफी, बॉलिवूड, रॅप, रॉक, गझल यांसह विविध प्रादेशिक भाषेतील संगीताचे प्रत्येक रंग येथे अनुभवायला मिळत आहेत. वीकेंडला कॉन्सर्टला जाणे हा तरुणाईचा नवा ट्रेंड बनला आहे. याविषयी 'इव्हेंट ॲण्ड एंटरटेन्मेंट मॅनेजमेंट असोसिएशन'चे (इमा) सदस्य निखिल कटारिया म्हणाले, 'जगभरात म्युझिक कॉन्सर्ट होतातच.

कॉन्सर्ट एक; मात्र त्याची तयारी प्रचंड
२ ते ३ महिन्यांपूर्वीपासून नियोजन सुरू
कॉन्सर्टच्या व्यवस्थापनासाठी सुमारे ३०० जणांची टीम कार्यरत
पोलिस, महापालिका आणि इतर विभागांच्या परवानग्या अनिवार्य
एका कॉन्सर्टसाठी अंदाजे ८ कोटींहून अधिक

यामुळे रोजगाराच्या नव्या संधीही निर्माण होत आहेत. साऊंड, लाईटिंग, रंगमंच व्यवस्थापन, सुरक्षा, जाहिरात आणि प्रसिद्धी अशा विविध क्षेत्रांमधील अनेकांना काम मिळत आहे. महाराष्ट्रात मुंबईनंतर आता पुण्यात हा ट्रेंड वाढला आहे. बॉलिवूडमधील संगीत जगतातील कलाकारांचे कार्यक्रम होत आहेतच. आता तर विविध देशांमधील कलाकारही कला सादरीकरणासाठी येत आहेत.

---

## कर्जत मध्ये कोसळलेल्या पावसाच्या हलक्या सरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**कर्जत** : शहरात गुरुवारी दुपारी दोनच्या सुमारास अचानक वातावरणात बदल होत काही काळ पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या. यामुळे कर्जतकरांची उकाड्यातून सुटका झाली. हलक्या सरीने वातावरणात चांगलाच गारवा निर्माण झाला होता. पंधरा ते वीस मिनिटे पडलेल्या या पावसाच्या सरीने सखल भागात चांगले पाणी साचले होते. सध्या उन्हाने चाळीशी गाठली असून उष्णतेने सर्वसामान्य सजीव कासावीस होत आहे. वाढत्या उन्हामुळे नागरिक घामाघूम होत असताना गुरुवार, दि ७ मे रोजी दुपारी दोन वाजता कर्जत शहरात ढगांनी काळोख दाटला होता. अचानक पावसाच्या हलक्या सरी बरसल्याने सर्वसामान्य नागरिकांची चांगलीच त्रेधातिरपीट उडाली होती. तब्बल १५ ते २० मिनिटे पावसाच्या सरीने हजेरी लावली. शाळेला सुट्या असल्याने बाळगोपाळासह अनेकांनी या पावसात भिजण्याचा मनमुराद आनंद घेतला. या पावसाने नागरिकांची उकाड्यातून काही काळ का होईना सुटका झाली. सध्या मेच्या कडक उन्हाने सजीव सृष्टी होरपळून निघत असताना या पावसाने त्यांना देखील दिलासा मिळाला. सदरच्या पावसाने कसलीही नुकसानीची माहिती महसुल विभागाकडे नोंद नव्हती.

## उष्णतेची तीव्रता कमी होण्यासाठी सूर्यदेवतेला यज्ञाद्वारे साकडे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नेवासा : राहुरी व नेवासा तालुक्याच्या मध्यावर असलेल्या तिळापूर येथील श्री संगमेश्वर देवस्थान या ठिकाणी हनुमान भक्त ज्योतिष तज्ञ बाळकृष्ण महाराज कुलकर्णी यांनी महादेव मंदिरात पूजा व त्रिशूल पूजन करून महाराष्ट्रभर सुरू असलेली उष्णतेची त्रिवता कमी व्हावी म्हणून महायज्ञाद्वारे सूर्यदेवतेला साकडे घातले.

नेवासा तालुक्यातील अंमळनेर येथील रहिवासी असलेले बाळकृष्ण महाराज कुलकर्णी हे वेदशास्त्र संपन्न पुरोहित देखील आहे,जेव्हा जेव्हा देशावर संकट व अनिष्ट येते तेव्हा तेव्हा त्यांनी होम हवन द्वारे यज्ञ करून देवाला संकट निवारणासाठी साकडे घातले आहे.

सद्या उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसत आहे. यामध्ये मानवाला कोणतीही



हानी पोहचू नये, उष्माघातासारखे प्रकार घडु नये म्हणून कुलकर्णी महाराजांनी मुळा व प्रवरा नदीच्या संगमावर निसर्गरम्य परिसरात पुरातन महिमा असलेल्या संगमेश्वराला अभिषेक घालून उन्हाची त्रिवता कमी व्हावी व यातून मानवजातीचे संरक्षण व्हावे यज्ञ करून सूर्यनारायणाला साकडे घातले. याआधी कोरोनाच्या काळात बाळकृष्ण महाराज कुलकर्णी यांनी आपल्या गावकऱ्यांसह सहकाऱ्यांना बरोबर घेऊन यज्ञाद्वारे भगवंताला संकट दूर करण्यासाठी व मनुष्य हानी टळण्यासाठी त्यांनी साकडे घातले होते.


---

# ओतूर येथे पित्याकडूनच मुलीवर अत्याचार जुन्नर न्यायालयाचा कठोर निर्णय : आरोपी बापास जन्मठेप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा** : स्वतःच्या ९ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधम बापाला जुन्नर येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेपेची कठोर शिक्षा सुनावली आहे. विशेष न्यायाधीश एस.बी. शेलार यांनी हा निकाल दिला. १९ डिसेंबर २०२० रोजी दुपारी १ ते २ वाजण्याच्या दरम्यान ओतूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत ही घटना घडली. ९ वर्षांची पीडित मुलगी शाळेच्या मधल्या सुट्टीत जेवणासाठी घरी आली असता, घरात कोणी नसल्याची संधी साधून आरोपी वडील राजेश रामदास नवले याने घराचा दरवाजा आतून बंद केला. त्यानंतर त्याने स्वतःच्याच मुलीला मारहाण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

हा प्रकार मुलीच्या आईच्या लक्षात येताच त्याच दिवशी तिने ओतूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार आरोपीविरुद्ध गु.र.नं. ४८८/२०२० अन्वये भा.दं. वि. कलम ३७६(१)(२)(आय), (जे), ३२३ सह झजउडज कायदा २०१२ चे कलम ४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्कालीन



प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक पी.एच. कांबळे यांनी स्वतः तपास करून आरोपीला अटक केली. पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे व पो. हवा. देविदास खेडकर यांनी तपास करून आरोपीविरुद्ध सबळ पुरावे गोळा केले व न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सुनावणीदरम्यान आरोपीविरुद्ध सबळ पुरावे आढळल्याने न्यायालयाने आरोपी राजेश नवले यास दोषी ठरवले. झजउडज कायदा कलम ४(२) अन्वये त्याला ✻जन्मठेपेची सक्त शिक्षा व १० हजार रुपये दंड✻ ठोठावण्यात आला. दंड न भरल्यास ६ महिने अतिरिक्त कारावास भोगावा लागेल. तसेच भा.दं.वि. कलम ३२३ अन्वये ✻१ वर्ष सक्त कारावास व १ हजार रुपये दंड✻, न भरल्यास ३ महिने अतिरिक्त कारावासाची शिक्षा सुनावली आहे. पोलीस अधीक्षक संदिपसिंह गिल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, गणेश बिरादार, उपविभागीय अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पो. निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगीरे, कोर्ट पैरवी अधिकारी संतोष घोळवे, म.पो.हवा. मनिषा ताम्हाणे, पुजा औटी यांनी काम पाहिले. सरकारी पक्ष ॲड. जी.के. खोडे यांनी यशस्वीपणे बाजू मांडली

## आळंदी रोड व दिवे येथे वाहन योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण सेवा रविवारीही सुरू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे** : वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणाचे काम वेळेत पूर्ण व्हावे तसेच वाहनचालक व वाहनमालकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रादेशिक परिवहन विभागाकडून रविवार दि. १० मे २०२६ रोजी शासकीय सुट्टीच्या दिवशीही विशेष कामकाज सुरू ठेवण्यात येणार आहे. यानुसार आळंदी रोड कार्यालय तसेच मौजे दिवे येथील कार्यालयात वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणाचे कामकाज नियमितपणे सुरू राहणार आहे .वाहन चालक, वाहनमालक तसेच विविध वाहन संघटनांनी आपल्या वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण करण्यासाठी संबंधित कार्यालयात वाहने तपासणीसाठी सादर करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच सर्व स्कूल बस चालक व मालकांनी आपल्या स्कूल बसची तपासणी करून योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण करून घ्यावे. स्कूल बस वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणाला प्राधान्य देण्यात येणार असल्याचेही परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे.

---

# अष्टविनायकातील मोरगाव, थेऊर व सिद्धटेक येथील मंदिरे १० मे ते ९ जूनपर्यंत भाविकांसाठी बंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे** : अष्टविनायक विकास आराखड्याअंतर्गत तसेच पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या जतन, संवर्धन व दुरुस्ती कामांच्या पार्श्वभूमीवर श्री मयुरेश्वर मंदिर, श्री चिंतामणी मंदिर आणि श्री सिद्धिविनायक मंदिर ही मंदिरे दिनांक १० मे २०२६ ते ९ जून २०२६ या कालावधीत भाविकांच्या दर्शनासाठी पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती पुरातत्त्व विभागाकडून देण्यात आली आहे. अष्टविनायकातील मंदिरांचे जतन, देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने विशेष निधी उपलब्ध करून दिला असून, या कामांसाठी चिंचवड देवस्थान ट्रस्टतर्फे शासनाचे आभार मानण्यात आले आहेत. सध्या मोरगाव, थेऊर आणि सिद्धटेक येथे मुख्य मंदिर तसेच मंदिर परिसरातील जतन, संवर्धन आणि दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत.

पुरातत्त्व विभागाच्या नियोजनानुसार मंदिरांचा मुख्य गाभारा आणि सभामंडप यांचे पौराणिक स्वरूप जपत सुबक दगडी बांधकामाद्वारे संवर्धन करण्यात येणार आहे. या कामादरम्यान भाविकांची मोठ्या प्रमाणातील उपस्थिती कामात अडथळा निर्माण करू शकते तसेच कामाचा कालावधी वाढण्याची शक्यता असल्याने मंदिरे तात्पुरती बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासंदर्भात पुरातत्त्व विभागाच्या संचालकांनी सह धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग यांच्याकडे विनंती अर्ज सादर केला होता. त्यानंतर पुरातत्त्व विभाग, मंदिर प्रशासन, पुजारी वर्ग आणि ग्रामस्थ यांचे म्हणणे ऐकून घेत सह धर्मादाय आयुक्तांनी दि. ७ मे २०२६ रोजी मंदिरे तात्पुरती बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. सह धर्मादाय आयुक्तांच्या सूचनेनुसार चिंचवड देवस्थान ट्रस्टच्या विश्वस्त मंडळानेही मोरगाव, थेऊर आणि सिद्धटेक येथील मंदिरे भाविकांसाठी बंद ठेवण्याचा ठराव मंजूर केला आहे. तसेच दि. ८ मे २०२६ रोजी संबंधित ठिकाणी ग्रामस्थांच्या उपस्थितीत ग्रामसभा घेऊन मंदिर बंद ठेवण्याबाबत माहिती देण्यात येणार आहे. या कालावधीत मंदिरांमध्ये नित्य पूजाअर्चा व धार्मिक विधी नियमितपणे सुरू राहतील. मात्र भाविकांना मंदिर परिसरात प्रवेश किंवा प्रत्यक्ष दर्शनाची सुविधा उपलब्ध राहणार नाही. मंदिरांचे पुजारी, बांधकाम यंत्रणा, अधिकृत अधिकारी, कर्मचारी आणि विश्वस्त यांच्याशिवाय अन्य कोणालाही प्रवेश दिला जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

ही विकासकामे मंदिरांची दीर्घकालीन सुरक्षितता, सुविधा आणि भाविकांच्या सोयीसाठी अत्यंत आवश्यक असून ती नियोजनबद्ध व वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी नागरिकांनी आणि भाविकांनी मंदिर संस्थान, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन व स्थानिक प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



## द•ख•ल

### अजय देशमुख यांना पीएच. डी प्रदान

**लिंपणगाव :** येथील उपक्रमशिल शिक्षक अजय रामचंद्र देशमुख यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पीएच . डी ही डॉक्टरेट



पदवी प्रदान केली. अजय देशमुख यांनी ' महाराष्ट्र राज्यातील निरीक्षण गृहातील विधिसंघर्षित विद्यार्थ्यांच्या समायोजनासाठी राबविलेल्या उपक्रमांच्या परिणामकारकतेचा अभ्यास ' या विषयावर विद्यापीठास शोध निबंध सादर केला होता. त्यांच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमिक ८ विद्यालयांचा दहावीचा उत्कृष्ट निकाल

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील सहकार व शिक्षण महर्षी शिवाजीराव नागवडे बापू यांनी स्थापन केलेल्या एक आदर्श शिक्षण संस्था समजल्या जाणाऱ्या श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या आठ माध्यमिक शाळांचे मार्च २०२६ रोजी घेण्यात आलेल्या एसएससी परीक्षांचे निकाल आठ मे रोजी घोषित झाला. या शिक्षण संस्थांच्या आठ विद्यालयानी निकालाची परंपरा याही वर्षी समाधानकारक रित्या राखली गेली आहे. या शिक्षण संस्थेच्या तीन विद्यालयांचा १००% निकाल लागला गेला आहे. या शिक्षण संस्थेच्या विद्यालयांचा एसएससी परीक्षेचा निकाल पुढीलप्रमाणे, प्रामुख्याने इंदिरा गांधी विद्या निकेतन श्रीगोंदा फॅक्टरी, या विद्यालयाचा १०० टक्के तर पिंपळगाव पिसा येथील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयाचा देखील १०० टक्के निकाल घोषित झाला. या शिक्षण संस्थेच्या टाकळी कडेवळीत येथील लाल बहादूर शास्त्री विद्यालयाचा १०० टक्के निकाल, लोणी व्यंकनाथ येथील श्री व्यंकनाथ विद्यालयाचा ९७.८७%, पारगाव सुद्रिक येथील डॉ. राजेंद्र प्रसाद विद्यालयाचा ९५.८३%, तसेच पिंपरी कोलंदर येथील वसंतदादा पाटील विद्यालयाचा ९५. ६५%, हंगेवाडी येथील श्री हंगेश्वर विद्यालय हंगेवाडी या विद्यालयाचा ९४.७३%, पेडगाव येथील श्री छत्रपती संभाजी विद्यालयाचा ८९.३६% अशाप्रकारे विद्यालयाने या परीक्षेच्या माध्यमातून निकालाची उत्कृष्ट गुणवत्ता राखली गेली आहे. या संस्थेच्या सर्व विद्यालयाच्या यशस्वी विद्यार्थ्यांचे सहकार महर्षी नागवडे कारखान्याचे अध्यक्ष व छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे, जिल्हा बँकेच्या संचालिका सौ अनुराधा वहिनी नागवडे, संस्थेच्या उपाध्यक्षा सौ. मेघाताई औटी, संस्थेचे सर्व विश्वस्त मंडळ, छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे निरीक्षक सचिनराव लगड, ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे निरीक्षक बी के लगड आदींनी अभिनंदन करून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### श्री गजानन माध्यमिक विद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम



**ढोरजळगांव :** शेवगाव तालुक्यातील आव्हाणे बु येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहिगाव ने संचलित श्री गजानन माध्य व उच्च माध्य विद्यालयाचा एकूण निकाल ८५.२४% टक्के निकाल लागला आहे.यावर्षीही विद्यालयाने उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. विद्यालयात कु. आरेकर सिद्धी अंबादास - ८७.२०% गुण मिळवत प्रथम,कु चितळे समृद्धी नवनाथ -८४.२०% द्वितीय, कु. कळमकर सिद्धी एकनाथ -८२.४०% तृतीय तर कु आहेर श्रावणी कोंडीराम ८१.२०% चतुर्थ क्रमांक पटकावला आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मा.आ.डॉ. नरेंद्र घुले पाटील,सचिव मा.आ.चंद्रशेखर घुले पाटील, मा.ना.राजश्रीताई घुले पाटील, तसेच शेवगाव पंचायत समिती सभापती डॉ.क्षितिज घुले पाटील तसेच संस्थेचे प्रशासकीय अधिकारी के.वाय.नजन, समन्वयक विजय काशीद महाविद्यालयाचे प्राचार्य रमेश लांडे यांनी अभिनंदन केले आहे.

### एसएससी बोर्ड परीक्षेत शहरटाकळी विद्यालयाचे यश

**शहरटाकळी :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी बोर्ड परीक्षा २०२५-२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल ९४.११% इतका लागला आहे.

यावर्षी दहावी बोर्ड परीक्षेसाठी एकूण १८७ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट होते. त्यापैकी १७६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विशेष प्रविण्यासह ४८ विद्यार्थी तर ६१ विद्यार्थी प्रथम श्रेणीचे गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत.इतर सर्व विद्यार्थी चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत.

*सेमी माध्यमाचा निकाल हा १००% लागला असून ९५ विद्यार्थ्यांमधून कु. राधिका शंकर गोसावी व चैताली मोहन तूपसैंदर ९३.६०% गुण मिळवून दोघींनी विद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला आहे.द्वितीय क्रमांकावरील कु. सृष्टी रामनाथ म्हस्के हिने ९२.८०% गुण मिळवले. तर कु.अक्षता संदीप माळवदे हिने ९१.८०% गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला आहे. विद्यालयातील मराठी माध्यमाचा निकाल ८८.०४% इतका लागला आहे. प्रविष्ट ९२ विद्यार्थ्यांमधून कु.आराध्या चंपालाल हत्ते हिने ७८.२०% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. चि.सार्थक वैजिनाथ घोडखिंडे ७३.२०%गुणांसह द्वितीय तर कु.आकांक्षा लक्ष्मण नरवडे ७२.८०% गुणांसह विद्यालयात तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. या निकालाने शहरटाकळी विद्यालयाच्या प्रगतीचा आलेख आणखी उंचावला असून प्रथम आलेल्या विद्यार्थिनीचे विशेष कौतुक आहे. उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम असल्याचे उद्गार विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य सुनील जायभाये यांनी याप्रसंगी काढले. या गुणवंत विद्यार्थ्यांना सहशिक्षक रामदास पांढरे, सुनील जायभाये, दीपक बोडखे,आदिनाथ काटे,गणेश लबडे, बाळकृष्ण ठोंबळ, ज्ञानेश्वर जाधव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

### नवजीवनची कु सृष्टी मरकड केंद्रात प्रथम



**शहरटाकळी :** नवजीवन माध्यमिक वउच्च माध्यमिक विद्यालय दहिगाव या विद्यालयाचा एस एस . सी मार्च २०२६ बोर्डाचा निकाल १९१ पैकी १७० विद्यार्थी पास झाले. विद्यालयाचा निकाल ८९%लागला असून नवजीवन विद्यालय दहिगाव ने केंद्रात प्रथम कु मरकड सृष्टी प्रकाश हिने ९४.४०% गुण प्राप्त केले आहे. विद्यालयातील पहिले पाच गुणवंत विद्यार्थी प्रथम कु मरकड सृष्टी, द्वितीय मरकड ओम, तृतीय कु चव्हाण श्रावणी, चौथा कु चव्हाण आदिती, पाचवा क्रमांक विभागून कु जिवडे प्रांजली धनंजय व कु गुंजाळ शरयू जालिंदर यांनी यश मिळवले.

# वाड्यावस्त्यांवर अंधार.. बिबट्याचा वावर... जेऊरकरांचे जगणे असुरक्षित!

## उजेडाच्या आश्वासनावर अंधाराचा शिक्कामोर्तब ; सौर प्रकल्प ठरला मृगजळ ; ग्रामस्थ आक्रमक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** बिबट्याची दहशत अन् अंधाराचे साम्राज्य यामुळे जेऊर परिसरातील नागरिक संतप्त झाले आहेत. महावितरण कंपनीच्या जेऊर उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या गावांमध्ये सायंकाळच्या वेळी भारनियमन करण्यात येत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. नागरिकांचा संयम सुटत चालला असून ग्रामस्थ तीव्र आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत. सौर ऊर्जा प्रकल्प जेऊर पंचक्रोशीतील ग्रामस्थांसाठी 'मृगजळ' ठरत आहे.

जेऊर उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या गावांमध्ये गेल्या काही दिवसांपासून दररोज सायंकाळी सहा ते नऊ या वेळेत विजेचे भारनियमन करण्यात येत आहे. इतर वेळी देखील विजेचा लपंडाव सुरूच असतो. उष्णतेचा प्रचंड कडाका असताना भारनियमानामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. वाड्यावस्त्यांवर बिबट्याची दहशत दिसून येत आहे. शेटे वस्ती परिसरात दोन दिवसांपूर्वी बिबट्या दिसल्याची घटना घडलेली आहे. अशा परिस्थितीत वारंवार वीज खंडित व भारनियमन सुरू असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे.

जेऊर पंचक्रोशीतील विजेच्या भार नियमनाबाबत नागरिक, महिला, शालेय विद्यार्थी यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. भारनियमन बंद करून विजेचा सुरळीत पुरवठा करण्यासाठी बहिरवाडी, ससेवाडी, चापेवाडी, धनगरवाडी, डोंगरगण परिसरातून शिष्टमंडळ आमदार अक्षय कर्डिले यांना भेटणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली.




शेतकरी, महिला, विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांना भारनियमानाचा मोठा फटका बसत आहे. सायंकाळच्या वेळेत गावातील रस्ते, वाड्यावस्त्या आणि शिवार पूर्णपणे अंधारात बुडत असल्याने बिबट्याच्या हालचालींची ही भीती अधिक वाढली आहे. नागरिक जीव मुठीत धरुन वावरत आहेत. सौर ऊर्जा प्रकल्प सुरू करताना २४ तास सुरळीत वीज पुरवठा अशा चर्चा करण्यात येत होत्या. मात्र प्रत्यक्षात नागरिकांच्या वाट्याला अंधार आणि वारंवार खंडित होणारी वीजच येत असल्याचा आरोप ग्रामस्थांमधून केला जात आहे.

सायंकाळचे भारनियमन सर्वच नागरिकांच्या दृष्टीने गैरसोयीचे आहे. परिसरात बिबट्याचा वापर देखील आढळून आलेला आहे. सायंकाळी वाड्यावस्त्यांवरील शिवारात असलेल्या अंधाराच्या साम्राज्यामुळे अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनुचित प्रकार घडल्यानंतर प्रशासन जागे होणार का ? असा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

जेऊर पंचक्रोशीतील भार नियमन तात्काळ बंद करण्याची मागणी नारायण दादा तोडमल, शिवाजी आवारे, नरेंद्र तोडमल, बाळू शेटे, गणेश टिमकरे, नंदू तोडमल, हेमंत शेटे, शरद तोडमल, सोमनाथ देशमुख, निलेश पवार, रमेश पवार, गोरख तोडमल, प्रणव पवार यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# शैक्षणिक संस्कृतीला सर्वाधिक महत्त्व : कवाद सर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




शरदचंद्रजी पवार इमारतीमध्ये एक सुसज्ज वाचनालय मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टने सुरू केले असून आजपर्यंत शेकडो विद्यार्थ्यांनी या वाचनालयात अभ्यास करुण स्पर्धा परिक्षेत उत्तीर्ण होऊन अधिकारी झाले आहेत. एक सुसज्ज वाचनालय उभे करुण मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टने शैक्षणिक संस्कृतीला पाठबळ दिल्याची प्रतिक्रिया जनतेतून व्यक्त होत आहे.

**निघोज :** शैक्षणिक संस्कृतीला सर्वाधिक महत्त्व असून गेली पंधरा ते वीस वर्षांच्या कार्यकाळात निघोज परिसराचा शैक्षणिक विकास मोठ्या प्रमाणात झाला आहे .नावलौकिक वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणात मदत झाली असल्याचे प्रतिपादन मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद सर यांनी व्यक्त केले आहे.

वात्सल्य हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ.सुनिल कदम व रुपालीताई कदम यांची कन्या महिका कदम हि नुकतीच एम बी बी एस परिक्षा चांगल्या गुणवत्तेतून उत्तीर्ण झाल्याबद्दल महिकाची आजी ठकुबाई विष्णू कदम व कदम कुटुंबाने आनंद प्रित्यर्थ मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचालित मळगंगा प्रसादालयाला ४ हजार १०० रुपयांची देणगी दिली. याबद्दल महिका कदम,ठकुबाई कदम यांचा ट्रस्ट वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी कवाद बोलत होते.

यावेळी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त शंकरराव लामखडे, बबनराव ससाणे,विकास शेटे, व्यवस्थापक महेश ढवळे उपस्थित होते. कवाद सर यावेळी म्हणाले मुंबई येथे व्यवसाय करताना विष्णूशेठ कदम यांनी शैक्षणिक संस्कृतीला महत्त्व देऊन आपल्या कुटुंबातील मुलगा उच्च शिक्षण घेऊन समाजाची सेवा केली पाहिजे.

या उद्देशाने डॉ.कदम यांना एम बी बी एस डी सी एच पदवी घेऊन डॉक्टर केले. गेली पंचवीस वर्षांच्या कार्यकाळात डॉ.कदम यांनी अगदी अल्पदरात बालरोगतज्ज्ञ म्हणून रुग्णांची सेवा केली. डॉ. कदम व रुपालीताई कदम यांची मुलगी महिका ही एम बी बी एस झाली आहे. मुलगा शिवराज कदम हा बारावी विज्ञान परिक्षेत मुलिका देवी विद्यालयात प्रथम आला आहे. ही शैक्षणिक संस्कृती प्रत्तेकाने अंगीकारणे महत्वाचे आहे.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वस्त शंकरराव लामखडे यांनी केले शेवटी विश्वस्त बबनराव ससाणे यांनी आभार मानले.

### ताराबाई कन्या विद्यालयाचा १०० टक्के निकाल

**नगर तालुका :** केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयाचा निकाल उत्कृष्ट लागला .यामध्ये विशेष योग्यता असणाऱ्या ७६ विद्यार्थिनी आहेत, प्रथम श्रेणीमध्ये ३२ विद्यार्थिनी, द्वितीय श्रेणीत ७ अशा एकूण ११५ विद्यार्थिनीउत्तीर्ण झाल्या. स्वराली गवारे ९७ टक्के गुण मिळवून प्रथम आली, हिना शेख ९६ टक्के , जिया निनारिया ९४ टक्के गुण मिळवून तृतीया आली. ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या एकूण १४ विद्यार्थिनी आहे .याप्रसंगी विद्यालयाचे सचिव बबन कोतकर ,सहसचिव रावसाहेब सातपुते, अध्यक्ष रमेश गवळी, उपाध्यक्ष भास्कर जासूद, खजिनदार प्रल्हाद साठे,संचालक डॉ सुभाष बागले, जयद्रथ खाकाळ ,दगडू साळवे तसेच संस्थेचे सर्व संचालक मंडळ यांनी यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक संजय निक्रड ,जयश्री कोतकर तसेच विद्यालयाच्या प्राचार्या वासंती धुमाळ तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व विद्यार्थिनींचे कौतुक केले.

# दोन वर्षांपासून बंद पडलेला हातपंप अखेर सुरु

## नगरसेवक साईनाथ आधाट यांच्या तत्परतेची चर्चा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** शेवगाव तालुक्यातील स्मशानभूमी परिसरातील हातपंप तब्बल दोन वर्षांपासून बंद अवस्थेत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत होता. विशेषतः अंत्यविधीच्या दुःखद प्रसंगी पाण्यासाठी होणारी धावपळ नागरिकांच्या वेदनेत अधिक भर घालत होती. अनेकदा संबंधितांकडे पाठपुरावा करूनही प्रश्न दुर्लक्षित होता.

दरम्यान, मोहिते यांच्या अंत्यविधीप्रसंगी उपस्थित असलेले युवासेना जिल्हाप्रमुख तथा नगरसेवक साईनाथ आधाट यांच्या निदर्शनास ही गंभीर बाब आल्याने. दुःखाच्या वातावरणात नागरिकांची होत असलेली गैरसोय पाहून त्यांनी तत्काळ संबंधित यंत्रणा संपर्क साधत स्वखर्चाने हातपंप दुरुस्तीचे आदेश दिले.

साईनाथ आधाट यांच्या तत्परतेमुळे अवघ्या काही वेळातच बंद पडलेला हातपंप पुन्हा सुरू झाला. हातपंपातून पाणी येताच उपस्थित नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले. दोन वर्षांपासून रखडलेला प्रश्न अखेर मार्गी लागल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त करत नगरसेवकांचे आभार मानले. दुःखाच्या क्षणी माणसाच्या मूलभूत गरजा पूर्ण होणेही तितकेच महत्त्वाचे असते. आज ती गरज पूर्ण झाली, अशी भावना यावेळी उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली. नगरसेवक साईनाथ आधाट यांच्या संवेदनशील भूमिकेची परिसरात सर्वत्र चर्चा होत आहे.

# दहावीचा निकाल ९३.३५%

## यावर्षी देखील विद्यार्थिनींचाच बोलवाला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** शुक्रवारी दहावी परिक्षेचा निकाल लागला असून यात कर्जत तालुक्याचा एकूण निकाल ९३.३५ टक्के लागला. यंदा दहावी परीक्षेसाठी कर्जत तालुक्यातून ३ हजार ५५२ विद्यार्थी बसले होते. यापैकी ३ हजार ३१६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असल्याची माहिती कर्जत पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी प्रदीप चव्हाण यांनी दिली. यंदा देखील निकालात गुणांकनामध्ये मुलांपेक्षा मुलींनी चांगली बाजी मारली. दि ८ मे रोजी दहावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला. यात कर्जत तालुक्यातील विविध शैक्षणिक संस्थानी निकालाची उज्वल परंपरा कायम राखत नेत्रदीपक यश मिळवले. कन्या विद्यालयाच्या श्रुती गोकुळ नेटके (९७.४०), आदिती भाऊसाहेब पवार (९७), तेजस्विनी योगेश सुरवसे (९६.२०) या विद्यार्थीनीसह तब्बल २६ विद्यार्थीनींनी ९० टक्के पेक्षा जास्त गुणांकन प्राप्त करीत घवघवीत यश मिळवले. यासह रविशंकर विद्यामंदिराची पूर्वा मुकुंद काळे (९०.६०), मानसी अनिल चौधरी (९०.२०), अनुष्का ज्ञानदेव गदादे (८९.४०) टक्के गुण प्राप्त केले. अमरनाथ विद्यालयाची सिद्धी जनार्दन सुपेकर (९६.६०), आदेश खामगळ (९४.६०) आणि वैष्णवी रामदास वांगडे (९१) यांनी प्रथम तीन क्रमांक प्राप्त केले. शुक्रवारी सकाळी ११ वाजता शासनाच्या शिक्षण विभागाच्या साईटवर पालकांसह विद्यार्थ्यांनी आपला निकाल पाहत मिठाई भरवत आपला आनंदोत्सव साजरा केला. यासह अनेक विद्यार्थ्यांनी विद्यालयात धाव घेत गुरुजनांना पेढा भरवत आशीर्वाद घेतले.

# संत नामदेवरायांनी अभंगातून जीवनातील अध्यात्माची खरी दिशा दाखवली : ह. भ. प. रेवणनाथ महाराज लोंढे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** संत नामदेवरायांनी आपल्या अभंगातून माणसाला जीवनातील क्षणभंगुरता आणि अध्यात्माची खरी दिशा दाखवली. असे विचार ह भ प रेवणात महाराज लोंढे यांनी व्यक्त केले.

कै. चांगुणाबाई शिवराम बनसुडे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आयोजित धार्मिक कार्यक्रमात हरिभक्त परायण रेवणनाथ महाराज लोंढे यांनी संतश्रेष्ठ नामदेवरायांच्या अभंगातून जीवनाचे वास्तव आणि अध्यात्माचे महत्त्व अत्यंत प्रभावी शब्दांत स्पष्ट केले. कार्यक्रमाला परिसरातील भाविक, वारकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना रेवणनाथ महाराज लोंढे यांनी संत



नामदेवरायांचा प्रसिद्ध अभंग यमाचे यमदंड बैसतील माथा, तेव्हा तुझा रक्षीता कोण आहे याचे सखोल विश्लेषण केले. त्यांनी सांगितले की, संत नामदेवरायांनी आपल्या अभंगातून माणसाला जीवनातील क्षणभंगुरता आणि अध्यात्माची खरी दिशा दाखवली आहे.

महाराज म्हणाले की, संत नामदेवरायांनी मृत्युलोकात अवतार घेतल्यानंतर सामान्य समाजाकडे पाहिले असता माणूस हळूहळू अध्यात्मापासून दूर जाऊन 'अर्थ' या पुरुषार्थामागे धावत असल्याचे त्यांना जाणवले. पैसा आला की मान-सन्मान मिळतो आणि मान आला की बळ निर्माण होते. मात्र या सर्व मोहात अडकताना माणूस ज्यांनी त्याला जन्म दिला त्या आई-वडिलांकडे दुर्लक्ष करू लागतो, हीच समाजाची अधोगती असल्याचे त्यांनी नमूद केले.

ते पुढे म्हणाले की, जोपर्यंत शरीरात प्राण आहे तोपर्यंतच धन, संपत्ती, सौंदर्य आणि प्रतिष्ठा माणसासोबत असते. मृत्यूनंतर या गोष्टींपैकी काहीही सोबत जात नाही. त्यामुळे जीवनात असताना सत्कर्म, दया, सेवा, नामस्मरण आणि पुण्याची शिदोरी गोळा करणे आवश्यक आहे. ज्या व्यक्तीने आयुष्यभर चांगले कर्म केले, समाजासाठी योगदान दिले, त्याच व्यक्तीचे पुढे पुण्यस्मरण आणि पुण्यतिथी साजरी केली जाते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# बाळासाहेब उगले ठरले 'किंगमेकर'; रवींद्र उल्हारे यांचा ११३ मतांनी विजय

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** बाळासाहेब उगले यांच्या नेतृत्वाखालील विकास पॅनेलने घोरगाव ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत दमदार विजय मिळवत सत्ताधारी गटाला मोठा धक्का दिला. वॉर्ड क्रमांक १ मधील अनुसूचित जाती प्रवर्गाच्या जागेसाठी झालेल्या निवडणुकीत विकास पॅनेलचे अधिकृत उमेदवार रवींद्र उल्हारे यांनी ११३ मतांच्या फरकाने विजय संपादन केला.

निवडणुकीत रवींद्र उल्हारे यांना ३५० मते मिळाली, तर प्रतिस्पर्धी उमेदवार प्रतिभा उल्हारे यांना २३७ मते मिळाली. अपक्ष उमेदवारांना अत्यल्प मते मिळाल्याने ही लढत मुख्यतः दोन गटांमध्ये रंगली होती. या विजयामुळे गावातील राजकीय समीकरणे बदलल्याची



चर्चा सुरू झाली आहे.

या पोटनिवडणुकीची पार्श्वभूमीही महत्त्वाची ठरली. भोस गटाचे दिवंगत सदस्य आप्पासाहेब उल्हारे यांच्या निधनामुळे ही निवडणूक घेण्यात आली होती. मात्र, या निवडणुकीत मतदारांनी बदलाच्या बाजूने कौल दिल्याचे स्पष्ट झाले.

ग्रामपंचायतीतील विसंगत कारभार, सत्ताधारी गटातील मतभेद आणि सदस्यांमधील नाराजी याचा फटका सत्ताधाऱ्यांना बसल्याचे जाणकारांचे मत आहे. पोटात पिळ आणि विकासाला खिळ अशी भावना मतदारांमध्ये निर्माण झाल्याने विकास पॅनेलच्या बाजूने वातावरण झुकले.

विजयानंतर गावात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. कार्यकर्त्यांनी गुलाल उधळत आणि फटाक्यांची आतषबाजी करत आनंद व्यक्त केला.

यावेळी माजी सरपंच बाळासाहेब उगले म्हणाले, हा विजय म्हणजे सत्ताबदलाची नांदी आहे.

वॉर्ड क्रमांक १ मधील सुज्ञ मतदारांनी आमच्यावर दाखवलेला विश्वास महत्त्वाचा आहे. या विजयाचे श्रेय सर्व मतदार, कार्यकर्ते आणि युवा वर्गाला जाते.

घोरगावातील या निकालामुळे आगामी स्थानिक राजकारणात मोठे बदल घडण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# भगवानगड देवस्थानला ४ हेक्टर वनजमिनीचा ताबा

## महंत डॉ. नामदेव शास्त्री यांच्याकडे हस्तांतरित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**खरवंडी कासार :** श्रीक्षेत्र भगवानगड, पाथर्डी येथील देवस्थानच्या विकासासाठी महत्वपूर्ण ठरणाऱ्या वनविभागाच्या ४ हेक्टर जागेचा प्रत्यक्ष ताबा गुरुवारी गडाचे महंत ह.भ.प. डॉ. नामदेव शास्त्री यांच्याकडे सोपवण्यात आला. शेवगाव वनपरिक्षेत्र अधिकारी मिलिंद गोवेकर यांच्या हस्ते हा ताबा हस्तांतरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी वनविभागाच्या अधिकाऱ्यांसह गडावरील सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास शेवगाव वनपाल एकशिंगे, वनपाल मंचरे, वनरक्षक नाईकवाडे, वनरक्षक पालवे विजय, वनरक्षक साळवे व वनसेवक बाळू बटुळे आदी उपस्थित होते. ताबा मिळाल्यानंतर महंत डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी मिलिंद गोवेकर यांचा आध्यात्मिक ग्रंथ भेट देऊन यथोचित सन्मान केला. भगवानगडाच्या पुढील विकासकामांसाठी व भाविकांच्या सोयीसुविधांसाठी ही जागा अत्यंत उपयोगी पडणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. संत भगवान बाबा यांच्या गडाला वनजमीन मिळाल्याने परिसरातील भाविकांमधून आनंद व्यक्त होत आहे.

दैनिक राष्ट्र सह्याद्री

शनिवार दि.०९ मे २०२६



## लोखंडी हातोड्याने हल्ला : तिघांना तीन वर्षांची शिक्षा

**श्रीरामपूर :** मागील वादाच्या कारणावरून पेट्रोलपंपावर लोखंडी हातोडा व विटेने हल्ला करून मारहाण, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या तिघा आरोपींना प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने तीन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच आरोपींना एकूण ७५ हजार रुपयांचा दंड ठोठावला व दंड न भरल्यास एक वर्ष कारावासाची शिक्षा दिली आहे.

याबाबत श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असलेल्या गुन्ह्यात फिर्यादी नवनाथ अशोक जाधव यांच्यावर आरोपी शिवाजी शंकर वने, शंकर बाबुराव वने व चैतन्य दिलीप वने (सर्व रा. भेर्डापूर, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) यांनी इंडियन ऑईल पेट्रोलपंप, भेर्डापूर येथे लोखंडी हातोडा व विटेने हल्ला करत मारहाण केली होती. तसेच शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली होती.

या प्रकरणाचा तपास श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्याचे तपासी अंमलदार सहाय्यक फौजदार अर्जुन भैरू बाबर यांनी केला. सदरच्या कठल्याचे दोषारोप पत्र प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी दाखल करण्यात आले. सदर खटल्यात फिर्यादी, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी व तपासी अधिकाऱ्यांच्या साक्षी नोंदवून न्यायालयाने आरोपींना दोषी ठरवले.

# गर्भलिंग निदान प्रकरणात पुण्यातील दोघांचा तपासात सहभाग उघड

### आरोपींना १० मेपर्यंत पोलीस कोठडी; आतापर्यंत २ डॉक्टर, ४ एजंटसह १२ आरोपी अटकेत

### तीन महिलांचे बेकायदेशीर गर्भपात निष्पन्न



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर-राहाता परिसरात उघडकीस आलेल्या गर्भलिंग निदान आणि बेकायदेशीर गर्भपात प्रकरणाचा तपास दिवसेंदिवस अधिक गंभीर होत असून या प्रकरणातील आरोपींना न्यायालयाने १० मेपर्यंत वाढीव पोलीस कोठडी सुनावली आहे. तपासादरम्यान अनेक धक्कादायक बाबी समोर येत असून आता या रॅकेटचे धागेदोरे थेट पुण्यापर्यंत पोहोचल्याचे स्पष्ट झाले आहे.

आतापर्यंतच्या तपासात पोलिसांनी एकूण १२ आरोपींना अटक केली आहे. त्यामध्ये दोन डॉक्टर, चार एजंट आणि गर्भवती महिलांचे सहा पती यांचा समावेश आहे. श्रीरामपूर येथील एका डॉक्टरला बेकायदेशीर गर्भपात प्रकरणात अटक करण्यात आली असून त्याने पोलिसांसमोर काही गर्भपात झाल्याची कबुली दिल्याची माहिती समोर आली आहे.

तपासादरम्यान आणखी दोन आरोपींची नावे समोर आली असून हे दोघे पुणे येथील असल्याचे निष्पन्न झाले आहे. नेवासा येथील डॉ. राहुल भनगे आणि एजंट प्रदीप ढगे यांनी वापरलेले गर्भलिंग निदान करणारे सोनोग्राफी मशीन पुण्यातील या दोघांकडून खरेदी केल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. या दोघांना लवकरच ताब्यात घेऊन चौकशी करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दरम्यान, आरोपींनी ज्या महिलांचे गर्भलिंग निदान केले होते, त्या महिलांची ओळख पटवून त्यांचे जबाब नोंदवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. काही महिलांचे जबाब पोलिसांनी नोंदवले असून त्यापैकी तीन महिलांचे गर्भपात झाल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे हे गर्भपात अटक करण्यात आलेल्या आरोपी डॉक्टरांच्या दवाखान्यात काही एजंटांच्या मदतीने करण्यात आल्याचेही तपासात समोर आले आहे.

पोलिस तपासात या संपूर्ण रॅकेटची कार्यपद्धतीही उघड झाली आहे. एजंट आठ ते दहा गर्भवती महिलांचा गट तयार करून ठराविक दिवशी आणि वेळी त्यांना बोलावून घेत असत. संबंधित महिलांना त्यांच्या पती किंवा नातेवाईकांसह एका ठिकाणी आणले जात असे. तेथे रोख रक्कम घेतल्यानंतर महिलांच्या नातेवाईकांना थांबवले जाई आणि एजंट त्या महिलांना चारचाकी वाहनातून दुसऱ्या अज्ञातस्थळी घेऊन जात असत. तेथे सोनोग्राफी मशीनद्वारे गर्भलिंग निदान केले जात असे. त्यानंतर महिलांना पुन्हा मूळ ठिकाणी आणून सोडले जात होते.

या काळ्या धंद्यात डॉक्टरला प्रत्येक प्रकरणामागे दहा हजार रुपये मिळत होते, तर एजंटला प्रत्येकी तीन हजार रुपये दिले जात होते. एकापेक्षा जास्त एजंट असल्यास त्यानुसार रकमेची वाढ केली जात असल्याचेही तपासात निष्पन्न झाले आहे.

दरम्यान, या रॅकेटमध्ये आणखी काही एजंट, डॉक्टर आणि दलालांचा सहभाग असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली असून तपासाचा फास आता अधिक आवळला जात आहे. अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली लोणी पोलीस ठाण्याचे पथक या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास करत आहे.

# राहुरी विधानसभा मतदारसंघासाठी सहकार्य करणार : मुख्यमंत्री फडणवीस



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांनी सदिच्छा भेट घेतली. याप्रसंगी जिल्ह्याचे पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित होते. या भेटीदरम्यान विविध विकासकामे, मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न तसेच भविष्यातील विकास आराखड्यावर सकारात्मक चर्चा झाली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार अक्षय कर्डिले यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी राज्य शासनाकडून आवश्यक ते सहकार्य दिले जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

आमदार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पुष्पगुच्छ देऊन सदिच्छा व्यक्त करत मार्गदर्शनाबद्दल आभार मानले. मतदारसंघातील पायाभूत सुविधा, शेती, पाणीपुरवठा, शिक्षण व रोजगार निर्मिती यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर शासनस्तरावर सकारात्मक पाठबळ मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी आमदार अक्षय कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. तसेच राज्य शासन विकासाभिमुख धोरणांद्वारे ग्रामीण भागातील नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही त्यांनी नमूद केले. या सदिच्छा भेटीमुळे राहुरी मतदारसंघातील विकासकामांना अधिक गती मिळणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

## ट्रकच्या धडक : महिलेचा जागीच मृत्यू



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** शहरातील श्रीरामपूर-संगमनेर रस्त्यावर नार्दन बँच कॅनालवरील पुलाजवळ मालट्रकच्या धडकेत एका महिलेचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना गुरुवारी (दि. ८ मे) सायंकाळी घडली. गीता जयराम उपाध्ये (वय ५३) असे मृत महिलेचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गीता उपाध्ये या सायंकाळी आपल्या घराकडे जात असताना मालट्रक क्रमांक एमएच १६ एई ४५११ हा भरधाव वेगाने जात होता. यावेळी ट्रकने रस्त्याने जात असलेल्या गीता उपाध्ये यांना जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात त्या गंभीर जखमी होऊन जागीच मृत्यूमुखी पडल्या.

घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघातानंतर रस्त्यावर वाहनांची मोठी गर्दी झाली होती. पोलिसांनी तत्काळ वाहतूक सुरळीत करत कोंडी दूर केली. तसेच मालट्रक ताब्यात घेऊन पोलिस ठाण्यासमोर उभा करण्यात आला आहे. ट्रकवर 'भाग्यलक्ष्मी' असे लिहिले असल्याचे समजते.

याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

स्वर्गीय गीता उपाध्ये यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, दीर व अन्य नातेवाईक असा परिवार आहे. त्या पिपल्स बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी आनंदराम उपाध्ये, सत्यनारायण उपाध्ये व विजय उपाध्ये यांच्या भावजयी होत. त्यांच्या अपघाती निधनामुळे शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

## 'मानद वन्यजीव रक्षक' पदी भारती शेवते यांची नियुक्ती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** नगर महाराष्ट्र शासनाने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी 'मानद वन्यजीव रक्षक' म्हणून भारती अनिल शेवते यांना अधिकृत नियुक्ती दिली आहे. विशेष म्हणजे, या जबाबदारीवर नियुक्त होणाऱ्या त्या जिल्ह्यातील पहिल्या महिला ठरल्या आहे. वनविभाग कार्यालयात आयोजित विशेष कार्यक्रमात उपवनसंरक्षक सौ, अश्विनी दिघे यांच्या हस्ते भारती शेवते यांचा सन्मान आला. यावेळी अधिकारी तेलोरे, शिरसाठ, वनविभागाचे अधिकारी-कर्मचारी, तसेच निसर्ग भ्रमंती ग्रुपचे विद्यासागर पेटकर आणि निसर्गप्रेमी उपस्थित होते, करण्यात जखमी वन्यजीवांचे रेस्क्यू, शिकारींवर नजर, वन्यजीव गुन्ह्यांची माहिती प्रशासनापर्यंत पोहोचवणे, तसेच नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करणे या क्षेत्रात भारती शेवते गेल्या अनेक वर्षांपासून सक्रियपणे कार्यरत आहेत. त्यांच्या या धाडसी आणि सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत शासनाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे.

भारतातील वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ (Wildlife Protection Act 1972) अंतर्गत वन्यजीवांची शिकार, तस्करी, अवैध व्यापार आणि अधिवास नष्ट करणे हा गंभीर गुन्हा मानला जातो. या कायद्यांतर्गत दोषींवर दंड आणि कारावासाची तरतूद असून, वनविभागासोबत समन्वय साधून मानद वन्यजीव रक्षकांना देखील संरक्षण आणि जनजागृतीच्या कामात महत्वाची भूमिका बजावता येते. भारती शेवते म्हणाल्या हा सन्मान माझा नसून जंगलातील त्या मूक प्राण्यांचा आहे, ज्यांच्या संरक्षणासाठी मी आयुष्यभर कास करत राहणार आहे.

## तरुणाची दीड लाखांची बॅग भामट्यांनी केली लंपास

**राहुरी :** तालुक्यातील सडे येथील एका तरुणाची दीड लाख रुपये रोख रक्कम असलेली बॅग अज्ञात तीन भामट्यांनी भरदिवसा पळवून नेल्याची घटना शुक्रवारी (दि. ८) दुपारी राहुरी शहरातील शुक्लेश्वर चौक येथे घडली. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, ओमप्रकाश भाऊसाहेब पानसंबळ (वय २६, रा. सडे, ता. राहुरी) यांनी राहुरी शहरातील महाराष्ट्र बँकेतून दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास दीड लाख रुपये रोख रक्कम काढली. ही रक्कम त्यांनी एका पिशवीत ठेवून ती पिशवी मोटारसायकलच्या हँडलला अडकवली होती.

त्यानंतर ओमप्रकाश पानसंबळ हे मोटारसायकलवरून घरी जात असताना शुक्लेश्वर चौक परिसरात त्यांच्या खिशातून काहीतरी पडल्याचा भास झाला. त्यामुळे त्यांनी मोटारसायकल उभी करून काही अंतरावर जाऊन पाहणी केली.

याच संधीचा फायदा घेत त्यांच्या हालचालींवर पाळत ठेवून असलेल्या अज्ञात तीन भामट्यांनी मोटारसायकलवरील पैशांची पिशवी चोरून नगर-मनमाड रस्त्याच्या दिशेने पलायन केले.

घटनेची माहिती मिळताच पानसंबळ यांनी आरडाओरडा करत आरोपींचा पाठलाग केला. मात्र काही क्षणांतच आरोपी मोटारसायकलवरून पसार झाले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपींचा शोध सुरू केला.

याप्रकरणी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

## नान्नजच्या हल्यात : एक जखमी चौंघा विरोधात गुन्हा दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** जामखेड तालुक्यातील नान्नज हाळवस्ती येथे चंद्रकांत गोरे हे त्यांच्या घरासमोर झोपलेले होते झोपेतच त्यांना चापट मारून उठवून जुन्या भांडणांचा राग मनात धरून चौघांनी जीवे मारण्याच्या उद्देशाने लोखंडी रॉड व कोयत्याने मारहाण करून गंभीर जखमी केले. या प्रकरणी चार जणांविरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे नान्नज सह जामखेड तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

या घटनेची पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, फिर्यादी चंद्रकांत कल्याण गोरे, (वय ५० , रा. हाळवस्ती नान्नज ता. जामखेड ) हे घरासमोरील पटांगणात बाजेवर रात्री साडेदहा वा. चे सुमारास झोपले होते. दि. ५ मे रोजी रात्री १ ते १.३० वा.चे सुमारास त्यांच्या गालात जोरात कोणीतरी चापट मारली. त्यावेळी ते जागे झाले. नंतर गोरे बाजेवर उठुन बसताच समोर यशदीप साळवे, सतिष साळवे, बाबा शेख, सद्दाम पठाण असे उभे दिसले. ते त्यांना म्हणाले मला चापट का मारता असे विचारताच यशदीप साळवे याने त्याचे हातातील लोखंडी कोयत्याने त्यांना जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने कपाळावर उजव्या बाजुस जोराने मारुन गंभीर जखमी केले. व ते पळू लागतात सतिष साळवे, बाबा शेख व सद्दाम पठाण यांनी त्यांचे हातातील लोखंडी रॉडने त्यांच्यावर हल्ला करुन आता याला जिंवत सोडू नका म्हणुन गंभीर मारहाण केली. या प्रकरणी चार जणांविरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वी ओम यांचा मुलगा ओम गोरे याचे नान्नज गावातील साळवे कुटुंबाशी भांडण झाले होते.या भांडणामुळे ओम व जावई वैभव साबळे, त्याचा भाऊ- सार्थक साबळे, वडील- विजय साबळे असे सध्या जामखेड कारागृहात आहेत. दि.४ मे रोजी मुलगी सानिका साबळे, माझी पत्नी मनिषा या दोघी जामखेडला दवाखान्यात होत्या. मी घरी एकटाच होतो. घटनेनंतर जखमी गोरे यांनी आरडाओरडा केल्याने आरोपी पळून गेले. जखमी गोरे यांना रुणालयात दाखल करण्यात आले.

### शेअर बाजार गुंतवणूक फसवणूक प्रकरण

## जालिंदर काळे सह चौघांचा जामीन नाकारला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** शेवगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणात गाजलेल्या शेअर बाजार गुंतवणूक फसवणूक प्रकरणातील सहआरोपी जालिंदर बाळासाहेब काळे,शरद अंकुश काळे, राजेश एकनाथ काळे यांचा नियमित जामीन अर्ज व उमेश उर्फ बाल्या सुखदेव गायकवाड याचा अटकपूर्व जामीन अर्ज ६ मे २०२६ रोजी जिल्हा व सत्र न्यायालयाने नामंजूर केलेला आहे.

शेवगाव येथील रहिवासी फिर्यादी अवधूत विनायक केदार यांनी मुख्य आरोपी साईनाथ कल्याण कवडे याच्याविरुद्ध शेवगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनुसार आरोपीने स्वतः ची ऍसिटेक सोल्युशन्स ही शेअर मार्केट ट्रेडिंग कंपनी असल्याचे भासवून गुंतवणुकीवर १२ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवले. या आमिषाला बळी पडून फिर्यादी व इतर गुंतवणूकदारांनी आरोपीकडे एकूण १ कोटी ६१ लाख ४२ हजार ९०० रुपयांची गुंतवणूक केली. मात्र आरोपीने ना अपेक्षित परतावा दिला ना गुंतवलेली मूळ रक्कम परत केली. दरम्यान दि. २८ऑक्टोबर २०२४ रोजी शेवगाव पोलीस ठाण्यात आर्थिक फसवणुकीची तक्रार दाखल करण्यात आली.या प्रकरणात आरोपी व सह आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर सहआरोपी जालिंदर काळे, शरद काळे व राजेश काळे यांनी नियमित जामिनासाठी अर्ज केला होता. या अर्जाला फिर्यादी अवधूत विनायक केदार यांनी उच्च न्यायालयात ड. प्रशांत प्रभाकर गिरी यांच्यामार्फत तसेच सहआरोपी उमेश उर्फ बाल्या गायकवाड याने अटकपूर्व जामीनासाठी अर्ज केला होता. या अर्जाला फिर्यादीतर्फे ड.पंकज पद्माकर खराडे यांनी तीव्र विरोध केला. न्यायाधीश केदार एस.कुलकर्णी यांच्यासमोर झालेल्या सुनावणीत न्यायालयाने उपलब्ध कागदपत्रे व तपासातील बाबींचा सखोल विचार केला. आरोपींनी खोटी आश्वासने देऊन गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते तसेच उच्च न्यायालयातील रीट याचिकेमध्ये दिलेल्या हमीचा भंग झाल्याचेही नोंदितून स्पष्ट झाले आहे. आरोपीला जामीन झाल्यास आरोपी पळून जाण्याची तसेच साक्षीदारांवर दबाव आणण्याची शक्यता नाकारता येत नाही असेही न्यायालयाने नमूद केले. या सर्व कारणांचा विचार करता आरोपींविरुद्ध ठोस पुरावे उपलब्ध असून गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता जालिंदर काळे,शरद काळे, राजेश काळे, व उमेश उर्फ बाल्या गायकवाड यांना जामीन देणे योग्य नसल्याचे सांगत त्यांचे जामीन अर्ज फेटाळून लावले आहेत. या प्रकरणात मूळ फिर्यादी अवधूत विनायक केदार यांच्यावतीने ड. प्रशांत प्रभाकर गिरी, ड.पंकज पद्माकर खराडे यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. त्यांना ड. योगेश कासोद,ड.पवन जोंधळे,ड. तुषार जगताप यांनी याकामी सहकार्य केले.

# उंबरी बाळापुरात तरुणाने सरकारी रस्त्यावर फिरवला नांगर

### सार्वजनिक मालमत्तेचे मोठे नुकसान



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापूर येथे एक अत्यंत धक्कादायक आणि अजब प्रकार उघडकीस आला आहे. एका तरुणाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असलेल्या जिल्हा मार्गावर चक्क ट्रॅक्टरच्या साहाय्याने नांगरणी करून रस्ता उखडून टाकला आहे. या कृत्यामुळे केवळ रस्त्याचेच नुकसान झाले नाही, तर जवळच असलेल्या प्रवरा डाव्या कालव्याच्या भरावाचेही नुकसान झाल्याने सिंचन व्यवस्थेला धोका निर्माण झाला आहे. याप्रकरणी आश्वी पोलीस ठाण्यात संबंधित तरुणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग, राहाता अंतर्गत 'संगमनेर-जोर्वे-उंबरी बाळापूर-दाढ बुद्रुक-कोल्हार' या जिल्हा मुख्य मार्ग क्र. २१ चे काम सुरू आहे. ७ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास उपविभागीय अभियंता श्री. गुंजाळ यांनी मुकादम बबन बाबूराव ओव्हळ यांना फोनवरून माहिती दिली की, उंबरी बाळापूर येथे कुणीतरी अज्ञात व्यक्तीने रस्त्यावर नांगर फिरवून काम खराब केले आहे.

माहिती मिळताच बबन ओव्हळ यांनी सहकारी मयूर गायकर यांच्यासह घटनास्थळी धाव घेतली. तिथे प्रवरा डावा कालव्याजवळील पुलापाशी पाहिले असता, रस्त्याची नांगरणी केल्याचे स्पष्टपणे दिसून आले. यावेळी जलसंपदा विभागाचे शाखा अभियंता सिद्धांत शिंदे हेदेखील तेथे उपस्थित होते.

रस्ता कुणी नांगरला याबाबत ओव्हळ यांनी परिसरातील ग्रामस्थांकडे चौकशी केली असता, लक्ष्मण शंकरराव भुसाळ आणि नानासाहेब सुखदेव उंबरकर यांनी सांगितले की, महेश ऊर्फ छोट्या अनिल सरोदे (रा. उंबरी बाळापूर) याने त्याच्या ताब्यातील लाल रंगाच्या विना नंबरच्या 'स्वराज ७४४ एक्स टी' ट्रॅक्टरने ही नांगरणी केली आहे.

महेश सरोदे याने केवळ रस्ताच नांगरला नाही, तर प्रवरा डाव्या कालव्याच्या कडेला असलेला मातीचा भरावदेखील नांगरून काढला. यामुळे कालव्याच्या स्थैर्याला धोका निर्माण झाला असून, पाणी सोडल्यानंतर कालवा फुटण्याची भीती निर्माण झाली आहे. सरकारी कामात अडथळा आणून सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केल्याबद्दल प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेतली आहे.

याप्रकरणी मुकादम बबन ओव्हळ यांनी आश्वी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी आरोपी महेश ऊर्फ छोट्या अनिल सरोदे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३२४ (५), २८५ आणि महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ चे कलम ९३ (१) (क) नुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस उपनिरीक्षक दीपक बर्डे करत आहेत.

सरकारी रस्ता नांगरल्याच्या या अजब घटनेमुळे संपूर्ण संगमनेर तालुक्यात मोठी खळबळ उडाली असून, तरुणाने हे टोकाचे पाऊल कोणत्या रागातून किंवा कारणातून उचलले, याचा तपास पोलीस करत आहेत.